
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २१३
www.ramprahar.com

◆ गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ ◆पाने ८ ◆किंमत ₹ २

## मालवणमध्ये शिवरायांच्या किल्ल्यांसाठी अध्यासन केंद्र



**मुंबई :** सिंधुदुर्गातील सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, राजकोट आणि सर्जेकोट या चार किल्ल्यांच्या सखोल अभ्यासासाठी मुंबई विद्यापीठअंतर्गत स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागाकडून ५० लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली. या निर्णयामुळे सिंधुदुर्गातील किल्ल्यांच्या अभ्यास, संशोधन आणि दस्तावेजीकरणाला नवी दिशा मिळणार असून हे अध्यासन मालवण येथे स्थापन होणार आहे. शिवकालीन व्यापाराचे महत्वाचे केंद्र म्हणून ओळखल्या गेलेल्या या भागातील ऐतिहासिक दाखल्यांचा सखोल अभ्यास होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा आणि दूरदृष्टीचा व्यापक प्रसार करण्यास हे अध्यासन हातभार लावेल, असा विश्वास मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केला आहे.

## अंतरंग

उरण नगर परिषदेच्या विशेष समित्या जाहीर/३
श्रीवर्धन तालुक्यात 'रानवली पॅटर्न' ठरतोय आदर्श/७
रायगड जिल्ह्यात एमसीएच्या क्रिकेट सामन्यांना सुरुवात/८

### नवी मुंबई विमानतळ येथे होणार कार्गो हब

# महाराष्ट्राच्या व्यापाराला जागतिक गती

## मुख्यमंत्री फडणवीसांचे भूमिपूजन सोहळ्यात प्रतिपादन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**





नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन हा भारत, मुंबई आणि महाराष्ट्रासाठी पुरवठा व्यवस्थान खर्च क्षेत्रातील ऐतिहासिक टप्पा असून, या सुविधेमुळे राज्यातील उद्योग, निर्यात आणि व्यापाराला मोठी चालना मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीत फेडेक्सने मुंबईत गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय हा भारताच्या आर्थिक सामर्थ्याचा आणि महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांवरील जागतिक विश्वासाचा महत्त्वपूर्ण पुरावा असल्याचे त्यांनी नमूद केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्सच्या समर्पित कार्गो हबचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार मंदा म्हात्रे, भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, वाय. टी. देशमुख, स्वर्गीय दि. बा. पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक आणि उपाध्यक्ष विजय सिंघल, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि. चे संचालक जीत अदानी, फेडेक्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमण्यम, फेडेक्स एमईआयएसच्या अध्यक्षा कामी विश्वनाथन, रिचर्ड स्मिथ, अरुण बंसल आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, फेडेक्सच्या कार्गो हबचे भूमिपूजन भारत, महाराष्ट्र आणि मुंबईसाठी पुरवठा व्यवस्थान खर्च क्षेत्रातील ऐतिहासिक घटना आहे. जागतिक व्यापारातील बदलत्या परिस्थितीत फेडेक्सने मुंबईत गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय भारत आणि महाराष्ट्राच्या वाढत्या आर्थिक सामर्थ्याचे प्रतीक आहे.


फेडेक्सची जागतिक स्तरावरील मजबूत उपस्थिती आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे महाराष्ट्रातील कार्गो हाताळणी आणि व्यापाराला मोठी चालना मिळेल, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भविष्यात भारतातील सर्वोत्कृष्ट आणि सर्वाधिक व्यस्त प्रवासी व कार्गो विमानतळ ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. **(पान २ वर..)**

## एमपीएससीच्या अध्यक्षपदी विवेक भीमनवार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी)च्या अध्यक्षपदी विवेक भीमनवार या भारतीय प्रशासन सेवेतील ज्येष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती झाली आहे. या पदाची व गोपनीयतेची शपथ राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिली. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते.


## बीपीच्या बनावट गोळ्या विकणारे अटकेत

**डोंबिवली :** नामांकित कंपनीच्या नावे बनावट 'Telma AM' औषधाची विक्री डोंबिवलीत होत असल्याचे समजल्यावर मनपाडा पोलिसांनी दोन वितरकांना गजाआड केले. उच्च रक्तदाबासाठी वापरल्या जाणाऱ्या 'Telma AM' या नामांकित औषधाच्या बनावट गोळ्यांची विक्री संबंधितांकडून करण्यात येत होती.





## कबड्डी निवड चाचणी स्पर्धेसाठी क्रीडानगरी सज्ज



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील नव्हेच तर राज्यातील प्रतिष्ठेची समजली जाणारी रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी निवड चाचणी स्पर्धा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर दिनांक २० ते २२ फेब्रुवारीपर्यंत संपन्न होणार असून त्यासाठी रामशेठ ठाकूर क्रीडा नगरी सज्ज झाली आहे.

खेळ आणि कबड्डीच्या विकासासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी तन, मन, धनाने चालना दिली आहे. पनवेलमध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय स्पर्धा अनेकवेळा आयोजित करून राज्यात आणि राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक केले आहे. त्याचबरोबर पनवेल आणि रायगडचे नाव उच्च स्तरावर पोहचविले आहे. **(पान २ वर..)**


## देशातील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणुक जाहीर

**नवी दिल्ली :** भारतीय निवडणूक आयोगाने बुधवारी देशातील १० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकींचा कार्यक्रम जाहीर केला आहे. ही निवडणुकीसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी संध्याकाळी मतमोजणी केली जाणार आहे.

राज्यसभेच्या या ३७ जागा येत्या एप्रिल महिन्यात रिक्त होणारा आहेत. महाराष्ट्र (७), ओडिशा (४), तमिळनाडू (६), पश्चिम बंगाल (५), आसाम (३), बिहार (५), छत्तीसगड (२), हरियाणा (२), हिमाचल प्रदेश (१) आणि तेलंगणा (२) अशी या जागांची संख्या आहे.

राज्यसभेचा कार्यकाळ संपणार असलेल्या नेत्यांमध्ये अनेक बड्या नावांचा समावेश आहे. ज्यामध्ये शरद पवार, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, काँग्रेसचे नेते अभिषेक मनू सिंघवी, तृणमूल काँग्रेसचे नेते साकेत गोखले, आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायन सिंह यांचा समावेश आहे.

या जागांसाठी २०२० मध्ये द्विवार्षिक निवडणुका झाल्या होत्या. तेव्हा भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्र पक्षांनी आसाम, बिहार, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशमध्ये मोठे यश मिळवले होते. महाराष्ट्रात या जागा भाजपा, दोन्ही गट एकत्र असलेली शिवसेना, दोन्ही गट एकत्र असलेली राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात विभागलेल्या होत्या. तमिळनाडूमध्ये डीएमकेच्या नेतृत्वाखालील युतीने बहुतांश जागा जिंकल्या होत्या.







# रजोनिवृत्ती क्लिनिकद्वारे महिलांना अखंडित आरोग्य सेवा द्या –राज्यमंत्री मेघना बोर्डीकर

**मुंबई : प्रतिनिधी**

देशातील पहिले रजोनिवृत्ती (मेनोपॉज) क्लिनिक महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात सुरू असून या क्लिनिकद्वारे राज्यातील महिलांना अखंडित सेवा द्यावी, या अनुषंगाने महिलांची आरोग्य तपासणी करण्याचे निर्देशही आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर–साकोरे यांनी दिले.



मुंबई येथे राज्यमंत्री बोर्डीकर–साकोरे यांच्या अध्यक्षतेखाली रजोनिवृत्ती (मेनोपॉज) क्लिनिकबाबत आढावा बैठक झाली. बैठकीस आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत आरोग्य विभागाने राज्यात रजोनिवृत्ती क्लिनिक उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली आहे. १४ जानेवारी २०२६ रोजी सुरू झालेल्या या उपक्रमास अल्पावधीतच राज्यभरातून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर–साकोरे यांनी यावेळी सांगितले.

या उपक्रमांतर्गत राज्यातील सर्व जिल्हा रूग्णालये, उपजिल्हा रूग्णालये, महानगरपालिका रूग्णालये तसेच निवडक ग्रामीण रूग्णालयांमध्ये रजोनिवृत्ती क्लिनिक सुरू करण्यात आले असून दर बुधवारी रजोनिवृत्ती बाह्य रूग्ण सेवा सुरू करण्यात आली आहे. १४ जानेवारी २०२६ पासून १८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राज्यात ५८० ठिकाणी रजोनिवृत्ती क्लिनिक कार्यरत असून, सुमारे ३१,२८८ महिलांनी या सेवांचा लाभ घेतला आहे. यापैकी ३०,०३४महिलांना उपचार देण्यात आले असून, ८२ प्रकरणे पुढील तपासणीसाठी शिफारस समितीकडे पाठविण्यात आली आहेत.

या क्लिनिकच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वतंत्र मनुष्यबळ, औषध पुरवठा, क्लिनिकसाठी स्वतंत्र कक्ष, तसेच गोपनीयता आणि सुविधा उपलब्धतेचे मूल्यांकन करण्याचे निर्देश राज्यमंत्री बोर्डीकर–साकोरे यांनी दिले. तसेच तज्ज्ञ डॉक्टर, 'एनएचएम' अंतर्गत इम्पॅनल डॉक्टर आणि सेवाभावी तज्ज्ञांची मदत घेऊन क्लिनिकची संख्या वाढवण्यावर भर देण्याचेही निर्देश दिले.

नोंदी स्वतंत्रपणे ठेवण्यासाठी लाईन लिस्ट व रेकॉर्ड व्यवस्थापनाची व्यवस्था करून, भविष्यात आवश्यक मदत व उपचार सुलभ व्हावा, हा त्यामागील उद्देश असल्याचे असल्याचे सांगितले

## रायगडात मते मिळवण्यात शिवसेना अव्वल तर भाजप दुसऱ्या क्रमांकावर

**अलिबाग : प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सर्वाधिक २१ जागा शिंदेच्या शिवसेनेनी जिंकल्या. हा पक्ष जिल्हा परिषदेत मोठा गट ठरला त्याचबरोबर मते मिळवण्यातदेखील प्रथम कार्यक्रम मिळवला. तर भाजप दुसऱ्या, राष्ट्रवादी तिसऱ्या स्थानावर आहे.

जिल्ह्यात एकूण १७ लाख ३८१ नोंदणीकृत मतदार होते. यात ८ लाख ५३ हजार ९९९ महिला मतदार तर ८ लाख ४६ हजार ३५७ पुरूष मतदारांचा समावेश होता. २५ इतर मतदार होते. यापैकी ११ लाख ८८ हजार ८०४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, ६ लाख ४ हजार ८९६ पुरुष मतदारांनी तर ५ लाख ८३ हजार ९०४ महिला मतदारांनी मतदान केले. ४ इतर विभागातील जणांनी मतदान केले. शिवसेना शिंदे गटाला ३ लाख १२ हजार ५९० मते पडली आहेत. भाजपला २ लाख ६८ हजार ८४५ मतांचे दान झाले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेसला २ लाख ५४ हजार १७० मते पडली आहेत. शिवसेना शिंदे गटाला २६.२९ टक्के, भाजपला २२.६१ टक्के तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला २१.३९ टक्के मते पडली आहेत.

जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३ तर पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ३२९ उमेदवार निवडणूक रिंगणात होती. शिवसेना शिंदे गटाने जिल्हा परिषदेसाठी सर्वाधिक ४० उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले होते. त्याखालोखाल भाजपने ३०, राष्ट्रवादी काँग्रेसने २९, शिवसेना ठाकरे गटाने २०, शेकापने १८, काँग्रेसने ९, मनसेचे ३ तर आप, वंचित बहुजन आघाडी, मार्क्सवादी कम्यूनिस्ट पक्ष तर अपक्ष २१ उमेदवार निवडणुक रिंगणात होते. ७ फेब्रुवारीला मतदान झाले ६९ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

मतमोजणी ९ फेब्रुवारीला पार पडली. शिवसेना शिंदे गटाचे सर्वाधिक २१ उमेदवार निवडून आले. त्या खालोखाल राष्ट्रवादी काँग्रेसचे १६, भाजपचे १५, शिवसेना ठाकरे गटाचे ५ तर काँग्रेसचे २ उमेदवार विजयी झाले. पंचायत समितीच्या ११८ जागांपैकी सर्वाधिक ३६ जांगावर शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार विजयी झाले. त्याखालोखाल भाजपचे ३५ उमेदवार निवडून आले. राष्ट्रवादी काँग्रेसचे २८ सदस्य निवडून आले. तर शिवसेना ठाकरे गटाचे १३ तर शेकापचे सहा उमेदवार निवडून आले. शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गटाला प्रत्येकी पाच पंचायत समित्यांवर बहुमत मिळाले आहे. भाजपने तीन पंचायत समित्या जिंकल्या आहेत.

## खोपोली अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल**

**खोपोली : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलाने अत्याचार केल्याने अल्पवयीन मुलगी गर्भवती राहिल्याची घटना खोपोलीत घडली असून पिडीतेच्या आईने खोपोली पोलिस ठाण्यात धाव घेत आरोपी मुलाविरुद्ध तक्रार दिली आहे.

महिला फिर्यादी यांची मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असतांना देखिल तिचे अज्ञानपणाचा फायदा घेवुन आरोपी मुलाने वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबध ठेवुन पिडीत बालिकेला गरोदर केले. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक पुजा चव्हाण ह्या करीत आहेत.

## माझी वसुंधरा अभियानात रायगड जिल्हा परिषद राज्यात द्वितीय

**जिल्ह्यातील ८ ग्रामपंचायतींचे विविध गटात यश**

**अलिबाग : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानामध्ये रायगड जिल्हा परिषदेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकविला आहे. ग्रामपंचायत गटात राज्यस्तर व विभागस्तरावर जिल्ह्यातिल ८ ग्रामपंचायतींनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. जिल्ह्यातिल ८ ग्रामपंचायतींनी विविध गटांत यश मिळवत ५ कोटी ५० लाखांची बक्षिसे पटकावली आहेत.

माझी वसुंधरा अभियान ५.० हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १ जून २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत राबविण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थांनी अभियान कालावधीत केलेल्या कामाचे डेस्कटॉप मुल्यमापन व फिल्ड मुल्यमापन त्रयस्त यंत्रणांमार्फत करण्यात आले. या अभियानाचा निकाल मंगळवारी (दि. १७) सायंकाळी जाहीर करण्यात आला.

१ ते १.५ हजार लोकसंख्या गटांत खालापूर तालुक्यातील शिरवली ग्रामपंचायतीने राज्यात प्रथम क्रमांक (बक्षीस १ कोटी) व भूमी थीमॅटिकमध्ये राज्यात उच्चतम कामगिरीचा प्रथम क्रमांक (बक्षीस ५० लक्ष) अशी १.५० कोटीची बक्षीसे पटकवली आहेत. तसेच ५ ते १० हजार लोकसंख्येत राज्यस्तरावर खालापूर तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक व १ कोटीचे बक्षीस पटकवले आहे. याशिवाय ६ ग्रामपंचायतींनी कोकण विभाग स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून प्रत्येकी ५० लक्षचे बक्षीस मिळवले आहे. जिल्ह्यात १० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या गटात वासांबे ग्रामपंचायत, ५ ते १० हजार लोकसंख्येत चैक ग्रामपंचायत, ३ ते ५ हजार लोकसंख्येत



तांबाटी ग्रामपंचायत, २ ते ३ हजार लोकसंख्येत तुपगाव ग्रामपंचायत, १.५ ते २ हजार लोकसंख्येत वडवळ ग्रामपंचायत व १ ते १.५ हजार लोकसंख्येत नारंगी ग्रामपंचायतीने यश मिळविले. तसेच कोकण विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणारे गटविकास अधिकारीचा पुरस्कार खालापूर पंचायत समितीच्या संदीप कराड व जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी करणारे गटविकास अधिका–यांचा पुरस्कार पोलादपूरच्या दिप्ती घाट व रोह्याच्या शुभदा पाटील यांना मिळाला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) विशाल तनपुरे तसेच तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व तत्कालीन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) राजेंद्र भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली अभियान राबविण्यात आले आहे. माझी वसुंधरा अभियानामध्ये रायगड जिल्ह्यातील विविध गावे हिरीरीने भाग घेत असून यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होणार आहे. राज्यपातळीवर उत्कृष्ट ठरलेल्या ग्रामपंचायतींचा, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकार्यांचा सत्कार मुंबईत शनिवार (ता.२१) मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**माझी वसुंधरा अभियानामध्ये रायगड जिल्ह्यातील विविध गावांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. स्वच्छता, प्रदूषण, स्वच्छ पाणी याबाबत सातत्याने चांगले काम करण्यात येत आहे. यापुढेही अशाच प्रकारे काम सुरू राहणार असून शासन स्तरावरून नागरिकांना चांगल्या सुविधा देण्याचे काम करण्यात येत आहे. विजेत्या ग्रामपंचायतींचे अभिनंदन.**

**– नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.**

## जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मार्चला

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जल्हास्तरावर दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन साजरा होतो. परंतु माहे मार्च २०२६ मध्ये पहिला सोमवार, दि.०२ मार्च रोजी होळी सणानिमित्त स्थानिक सुट्टी जाहिर असून, दि.०३ मार्च २०२६ रोजी धुळीवंदन निमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने माहे मार्च २०२६ चा लोकशाही दिन बुधवार दि.४ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १.०० वा.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके यांनी कळविले आहे.

## कर्जत विविध विषय समित्यांचे सर्व सभापती बिनविरोध

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेमध्ये बुधवारी विविध विषय समित्यांची निवडणूक पार पडली. या नगरपरिषदे मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस – उद्धव सेना परिवर्तन विकास आघाडीची निर्विवाद सत्ता आल्यामुळे या निवडणुकीमध्ये विषय समितीचे सर्व सभापती परिवर्तन विकास आघाडीचे निवडून आले. हे सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले.

कर्जत नगर परिषदेच्या सभागृहामध्ये पीठासीन अधिकारी मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यालयीन अधिक्षक रवींद्र लाड उपस्थित होते. यावेळी स्थायी समितीमध्ये सात सदस्य असावेत. असे विरोधी पक्षाचे गट नेते संकेत भासे यांनी विनंती केली. त्यावर या विषयावर मतदान घ्यावे अशी मागणी नगरसेवक प्रशांत पाटील यांनी केली. त्यावर पाच सदस्य असावेत यासाठी मतदान घेण्यात आले. त्यावेळी १३ सदस्यांनी हात वर करून सहमती दिली. नंतर सात सदस्य असावेत यासाठी मतदान घेण्यात आले. त्यावेळी ८ सदस्यांनी हात वर करून सहमती दर्शविली. त्यामुळे विरोधी पक्षाच्या सर्व नऊ सदस्यांनी सभात्याग केला. नगरसेविका सुवर्णा जोशी या सभेला उपस्थित नव्हत्या.

त्यानंतर स्थायी समिती पदसिद्ध सभापती पुष्पा हरिश्चंद्र दगडे (नगराध्यक्ष) पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती सभापतीपदी सुचिता देवेंद्र खोत, वीज सार्वजनिक बांधकाम शहर नियोजन व विकास समिती सभापतिपदी महेंद्र बबन चंदन, महिला व बालकल्याण समिती सभापतिपदी हर्षाली उमेश गायकवाड, उपसभापतीपदी अंजली अतुल कडू यांची बिनविरोध निवड झाली तर स्वच्छता वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी पदसिद्ध म्हणून उपनगराध्यक्ष संतोष सुरेश पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले.

## पालीत भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन ३०० हून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

**पाली : प्रतिनिधी**

सामाजिक उत्तरदायित्वाचे भान जपत एस.आय. ग्रुप इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (रासळ), रोटरी क्लब लोटे आणि श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय भव्य मोफत आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. श्री बल्लाळेश्वर देवस्थानच्या भक्तनिवास क्रमांक १ मध्ये पार पडलेल्या या शिबिरात सुमारे ३०० लाभार्थ्यांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

शिबिराचे उद्घाटन सुधागड–पालीचे नायब तहसीलदार नकुल पोलेकर आणि सत्यम सुमिरन योगा रिसर्च फाउंडेशनचे संस्थापक डॉ. स्वामी योगप्रताप सरस्वती यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी रासळ ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रणिता खाडे, उपसरपंच दुर्गा दळवी, देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, एस.आय. ग्रुपचे सेक्रेटरी सचिन अणेराव,



मॅनेजर राजेंद्र महाडिक, उपेंद्र कानडे आणि रोटरी क्लब लोटेचे अध्यक्ष संदीप सुर्वे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या दोन दिवसीय शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली महत्त्वाच्या तपासण्या करण्यात आल्या. ज्यामध्ये बोन डेन्सिटी टेस्ट म्हणजे अत्याधुनिक मशीनद्वारे हाडांच्या ठिसूळपणाची तपासणी. मोतीबिंदू तपासणीसह गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप. विविध आजारांचे निदान करण्यासाठी मोफत रक्त तपासणी चाचण्या आदींचा समावेश होता.

## 'नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात रिक्त पदे त्वरित भरावीत'

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र हे मुंबई गोवा महामार्गा लगत असल्यामुळे अपघातग्रस्त व्यक्तींना तात्काळ प्राथमिक उपचार मिळावे व त्या व्यक्तीचा जीव वाचावा यासाठी नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्राची गरज असते परंतु नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्मचारी वर्गाची कमतरता असल्यामुळे अपघातग्रस्त व्यक्तीला अलिबाग किंवा पनवेल येथे पाठवावे लागते आणि या प्रवासा दरम्यान अपघातग्रस्त व्यक्तीचा जीव जाण्याचा शक्यता असते काही वेळेला अपघातग्रस्त व्यक्ती मरण देखील पावलेला आहे त्यामुळे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे त्वरित भरावीत अशी मागणी भाजप नेते किशोरभाई म्हात्रे यांनी केली आहे.

नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात स्टाफ नर्स, एलएचव्ही ,शिपाई, ओ. पी. डी एएनएम. /आरोग्य सेवीका मुख्यालय अशी रिक्त पदे असल्यामुळे अनेक आजारी पेशंट, गरोदर महिला,अपघातग्रस्त पेशंट यांना जिवंत असूनही मरण यातना भोगावी लागत आहे. नागोठणे विभागात अनेक आदिवासी वाड्या, खेडोपाड्या , ग्रामीण भाग असा मोठा परिसर असल्यामुळे नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्रात वरील लागणारी पदे भरती करावीत

## पान १ वरुन

### महाराष्ट्राच्या व्यापाराला जागतिक गती

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश (MMR) हा भारताच्या भविष्यातील आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू असून २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे योगदान देईल. पुरवठा व्यवस्थान खर्च कमी करणे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असून फेडेक्स सारख्या कंपन्यांमुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हा खर्च कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्र हा देशाच्या उत्पादन क्षेत्रात आघाडीवर असून फेडेक्स च्या सुविधेमुळे उद्योग, निर्यात आणि संपूर्ण व्यावसायिक परिसंस्थेला मोठा फायदा होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रास्ताविक भाषणात अदानी एअरपोर्ट होल्डिंग लि. चे संचालक जीत अदानी म्हणाले की, फेडेक्सने नवी मुंबईची केंद्र म्हणून केलेली निवड ही महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांवरील जागतिक विश्वासाचे प्रतीक आहे. विमानतळाची जवाहरलाल नेहरू बंदर जवळील धोरणात्मक स्थिती आणि अत्याधुनिक कार्गो सुविधा यामुळे हे हब जागतिक स्तरावर स्पर्धात्मक ठरेल. या प्रकल्पामुळे निर्यातदार, लघु–मध्यम उद्योग, औषध व कृषी क्षेत्राला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी थेट जोडणी मिळेल. महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याबद्दल विशेष उल्लेख करत देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले.

फेडेक्सचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी राज सुब्रमण्यम म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे फेडेक्स च्या पूर्णपणे स्वयंचलित आणि अत्याधुनिक एअर कार्गो हबचे भूमिपूजन हा भारताच्या जागतिक व्यापार जोडणीतील महत्त्वाचा टप्पा आहे. फेडेक्स चा हा भारतातील पहिलाच हब असून, तीन लाख चौरस फूट क्षेत्रफळावर जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानासह उभारला जाणार आहे. फेडेक्स कडून या प्रकल्पात २५० दशलक्ष अमेरिकी डॉलरपेक्षा अधिक दीर्घकालीन गुंतवणूक करण्यात येत असून, भारताच्या वाढत्या आर्थिक क्षमतेवरील विश्वासाचे हे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

हा प्रकल्प भारताच्या राष्ट्रीय पुरवठा व्यवस्थान खर्च धोरण आणि पीएम गतिशक्ती योजना उपक्रमाशी सुसंगत असून देशाची पुरवठा व्यवस्थान खर्च क्षमता वाढविण्यास मदत करेल. फेडेक्स चे नेटवर्क सुमारे २२० देशांमध्ये कार्यरत असून, नवी मुंबई हबमुळे भारत जागतिक पुरवठा साखळीत अधिक प्रभावीपणे सहभागी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### कबड्डी निवड चाचणी स्पर्धेसाठी क्रीडानगरी सज्ज

या रायगड जिल्हा पुरुष व महिला कबड्डी निवड चाचणी स्पर्धेच्या अनुषंगाने सुसज्ज अशी चार क्रीडांगणे तयार करण्यात आली आहेत. त्याचबरोबर मुख्य स्टेज, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच इतर पूरक सुविधांचीही तयारी पूर्ण झाली आहे.

या क्रीडांगणावर जवळपास ३५०० खेळाडू आपले कसब दाखवणार आहेत. यातून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा पुरुष आणि महिला संघ निवड होणार आहे. हि स्पर्धा उत्तम प्रकारे होण्यासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, कबड्डी असोसिएशनचे माजी सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांच्या नेतृत्वाखाली संयोजन समिती सचिव व राष्ट्रीय प्रशिक्षक शरद कदम, छत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर आदी पदाधिकारी विशेषत्वाने लक्ष देत आहेत. त्या अनुषंगाने स्पर्धेसाठी क्रीडानगरी सज्ज झाली आहे.

## विद्यार्थ्यांचा 'हिंद–दी–चादर' जनजागृती कार्यक्रमात सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

हिंद–दी–चादर गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम निमित्त १० फेब्रुवारीपासून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये मागील ७ दिवसात १.७५ लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आदरांजली अर्पण केली आहे. हिंद–दी–चादर असा बहुमान लाभलेल्या गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या अद्वितीय बलिदानाची, महान त्यागाची आणि मानवतेच्या रक्षणासाठी केलेल्या मौलिक कार्याची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेल्या विशेष माहितीपटाच्या चित्रफितीचे प्रसारण ३७० शाळा महाविद्यालयांमधून करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे ३७४ शाळा, महाविद्यालयांच्या परिसरात २,११,३०० विद्यार्थी, शिक्षकांनी एकत्रित येत प्रभातफेरीव्दारे गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याची महती जनमानसात प्रसारित केली आहे. याशिवाय शाळांमध्ये चित्रकला, निबंध, वक्तृत्व, गायन, घोषवाक्य, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांव्दारे गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे चरित्रगान केले आहे.

१६ व १७ फेब्रुवारी रोजी फादर ग्रेल मल्टीपर्पज स्कूल वाशी यांनी से.९ व १० च्या परिसरात प्रभातफेरीव्दारे जनजागृती केली. विशेष म्हणजे या प्रभातफेरीत वाशी गुरुव्दाराचे अध्यक्ष श्री. तेजींदर सिंग व त्यांचे सहकारी सहभागी झाले होते.

## सोनाली मुरुडकरने रांगोळीतून साकारले शिवराय

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या दत्तात्रय तटकरे महाविद्यालय येथे शिवजयंतीचा उत्सव यंदा एका वेगळ्याच भावविश्वात साजरा झाला. बी.एससी. प्रथम वर्षात (आय. टी. शाखा) शिक्षण घेणारी कु. सोनाली रणजित मुरुडकर हिने आपल्या कल्पकतेच्या रंगांनी अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवरायांची रांगोळी साकारून संपूर्ण महाविद्यालयाला अभिमानाची अनुभूती दिली.

शिवजयंतीच्या पावन निमित्ताने काढलेली ही रांगोळी केवळ रंगांची मांडणी नव्हती, तर ती शिवभक्तीची साक्ष होती. महाराजांच्या तेजस्वी मुखमुद्रेतील आत्मविश्वास, डोळ्यांतील निर्धार आणि भगव्या पार्श्वभूमीतील तेज या सर्वांचे जिवंत दर्शन या रांगोळीतून घडत होते. रांगोळी पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अक्षरशः



गर्दी केली होती. अनेकांनी या कलाकृतीसमोर उभे राहून मोबाईलमध्ये छायाचित्रे टिपले.


शालेय जीवनात असतानाच तिने चित्रकलेच्या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण करून आपल्या कलेची पायाभरणी केली. त्या काळातच तिच्या मनात रंगांविषयीची ओढ निर्माण झाली आणि रांगोळीच्या माध्यमातून चित्र रेखाटण्याची अनोखी आवड तिने जोपासली. कोणताही औपचारिक कोर्स न करता, केवळ सराव आणि जिद्दीच्या बळावर तिने स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

# शिवजयंतीनिमित्त उलवे नोडमध्ये भव्य मिरवणूक व 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवजयंतीनिमित्त उलवे नोड येथे भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती, गव्हाण यांच्या वतीने गुरुवार, १९ फेब्रुवारी रोजी हा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

या उत्सवानिमित्त सकाळी ८.३० वाजता गव्हाण येथून भव्य मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. वाद्यगजर, भगवे ध्वज आणि शिवरायांच्या जयघोषात ही मिरवणूक मार्गक्रमण करणार आहे. सकाळी ९.३० वाजता उलवे नोडमधील खारकोपर रेल्वे स्थानकाजवळील रामशेठ ठाकूर मैदान येथे मुख्य जयंती सोहळा होणार आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, माल्यार्पण व अभिवादनाचा कार्यक्रम होईल. यास



प्रमुख मान्यवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आदी उपस्थित राहणार आहेत.

जयंती सोहळ्यानिमित्त त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता रामशेठ ठाकूर मैदान येथे 'द फोक आख्यान' या कार्यक्रमांतर्गत सुप्रसिद्ध शाहीर चंद्रकांत माने आणि शाहिरा ऋतुजा माने यांचा 'महाराष्ट्राचा शाहिरी बाणा' हा विशेष शाहिरी कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमातून शिवचरित्र, महाराष्ट्राचा इतिहास, पराक्रम आणि संस्कृती यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या उत्सवासाठी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समिती तसेच गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, बेलपाडा, न्हावा, न्हावाखाडी, उलवे, वहाळ, मोरावे, बामणडोंगरी, जावळे व उलवेनोड येथील ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे. उत्सव समितीचे अध्यक्ष वसंत पाटील, उपाध्यक्ष अशोक कडू, जयवंत देशमुख, खजिनदार गजानन घरत यांनी शिवप्रेमींनी सहभागी होऊन जयंती सोहळा साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

# मोबाईल हॅक करून सहा लाख लंपास

**पनवेल :** मोबाईल फोनवर आलेली एक संशयास्पद एपीके फाइल डाऊनलोड करणे कामोठ्यातील एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. सायबरचोरांनी या फाईलच्या माध्यमातून तरुणाचा मोबाईल हॅक करून त्याच्या खात्यातून अवघ्या ५० मिनिटांत तब्बल सहा लाख ६१ हजार रुपये लंपास केले आहेत.

या घटनेतील तक्रारदार अविनाश (वय ३४) आयात-निर्यात क्षेत्रात क्लिअरिंग एजंट म्हणून कार्यरत आहे. अविनाशच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून एपीके फाइल आली. ती फाइल त्याच्या मोबाईलमध्ये आपोआप डाऊनलोड झाली. एपीके फाइल डाऊनलोड होताच काही वेळातच अविनाश याला त्याच्या खात्यातून एक लाख ९९ हजार रुपये काढले गेल्याचा मेसेज आला.

घाबरलेल्या अविनाश याने तत्काळ बँकेच्या कस्टमर केअरशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत त्याचा मोबाईल पूर्णपणे हॅक झाला होता. सायबरचोरांनी अविनाशचा मोबाईल हॅक करून अवघ्या ४४ मिनिटांत आठ वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे त्याच्या खात्यातून एकूण सहा लाख ६१ हजार रुपये लंपास केले.

# तरुण हरवल्याची तक्रार

**पनवेल :** कामाला जातो असे सांगुन राहते घरातुन निघुन गेला २८ वर्षीय तरुण अद्यापावेतो घरी परत न आल्याने तो हरवलीची तक्रार तळोजे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. हरविलेल्या तरुणाचे नाव राज शिवदास अहीरे असे असून त्याची उंची ५.५ फुट अंदाजे, सडपातळ बांधा, नाक सरळ, वर्ण सावळा, चेक्सचे क्रिम कलरचे फॉर्मल शर्ट व क्रिम रंगाची जिन्स घातलेली आहे. दरम्यान, या तरुणाबाबत कोणाला काही माहिती असल्यास तळोजे पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार गणपत पवार यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये विविध स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने शासनाच्या महत्त्वाकांक्षी माझी वसुंधरा ६.० - पर्यावरण सेवा योजना अंतर्गत सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण जनजागृतीपर उपक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.



पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाबाबत जागरूकता आणि प्लास्टिकमुक्त पनवेल घडविण्याच्या उद्देशाने उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनुसार सेंट जोसेफ हायस्कूलमध्ये विविध स्पर्धा व मार्गदर्शन सत्रे घेण्यात आली.

या उपक्रमांतर्गत हवामान बदल विषयक परिसंवाद, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन परिसंवाद, हवामान बदलाचे पर्यावरणावरील विषयावरील निबंध स्पर्धा, बेस्ट आऊट ऑफ वेस्ट वस्तू निर्मिती स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला. हवामान बदलाचे परिणाम, प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे निर्माण होणारे संकट आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

माझी वसुंधरा ६.० ही योजना पर्यावरण संवर्धनासाठी जनसहभाग वाढविणारी महत्त्वपूर्ण मोहिम असून जल संवर्धन, वृक्षारोपण, ऊर्जा बचत, कचरा व्यवस्थापन व जैवविविधता संवर्धन या घटकांवर विशेष भर देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासून पर्यावरणाबाबत जागरूकता व जबाबदारीची भावना निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरत आहे.

पर्यावरणपूरक, स्वच्छ व हरित पनवेल शहर घडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून नागरिकांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरण नगर परिषदेच्या विशेष समित्या जाहीर

**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेमध्ये निवडून आलेल्या १२ सदस्य व एक नामनिर्देशन सदस्य ॲड. पराग म्हात्रे असे एकून १३ सदस्य भाजपचे आहेत. बुधवारी (दि. १८) नगर परिषद येथे विशेष समित्या व त्यांचे सभापती व सदस्य यांची जाहीर बिनविरोध निवड करण्यांत आली.

उरण नगर परिषदमध्ये गटनेते जविंद्र लक्ष्मण कोळी आहेत. तर सार्वजनिक बांधकाम समिती व नियोजन व विकास समिती सभापती रवी यशवंत भोईर, उपसभापती सायली पाटेकर, सदस्या पूर्व योगेश वैवडे, स्वच्छता, वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य समिती व शिक्षण, क्रीडा व संसृतिक कार्य समिती सभापती जसिम इस्माईल गॅस, उपसभापती जविन्द्र लक्ष्मण कोळी, सदस्या रिबेका मढवी, पाणी पुरवठा आणि जलनि:स्सारण समिती सभापती -राजेश मधुकर ठाकूर, उपसभापती गणेश सदाशिव पाटील, सदस्य रोहित नितीन पाटील, महिला व बालकल्याण समिती सभापती सायली सविन म्हात्रे, उपसभापती दमयंती वैभव म्हात्रे, सदस्या रजनी सुनील पाटील आदी चार सभापती व सदस्य यांची



बिनविरोध नियुक्त्या करण्यांत आल्या.

या वेळी भाजप उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, नामनिर्देशन सदस्य ॲड. पराग म्हात्रे, उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील, मनन पटेल, अप्पू कोळी, सविन म्हात्रे, सनी कोळी, रीना पाटील, प्रकाश कडू, संदीप तांडेल, दिपेश कोळी आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

उरणचा विकास करण्यासाठी आमदार महेश बालदी यांनी निधी आणला आहे त्यामुळे उरण शहराचा कायापालट केला आहे. उरण नगर परिषदेमध्ये बहुमत आहे भाजपची सत्ता असल्यामुळे कोणताही ठराव हा आमच्या शिवाय पास होणार नाही. रखडलेली कामे पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत, सिडकोकडे प्रोसेसिंग करण्यासाठी कर आकारला जातो त्याची. सिडकोची उरण नगर परिषदेकडे थकबाकी आहे. त्याचा पाठपुरावा आमदार महेश बालदी यांच्या माध्यमातून करीत आहोत.

सरकारकडे प्रस्थाव पाठविला आहे. उरण शहराच्या विकासासाठी आमदार महेश बालदी यांनी उरण शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, समाज मंदिर, उरण बायपास रस्त्याचे काम लवकरच पूर्ण केले जाईल अशी बरीच विकासाची कामे केली आहेत कामे, असे पत्रकार परिषदेत पत्रकारांना सांगितले.

आमदार महेश बालदी यांनी राज्य शासन केंद्र शासन यांच्याकडून कोट्यवधी रुपयांचा निधी आणल्याने उरण नगरपालिकेची भव्य इमारत, उरण मोरा रोडचे कॉन्ट्रीकरण आदी कामे झालेली आहेत, अशी माहिती उपनगराध्यक्ष रवी भोईर यांनी या वेळी दिली. तर वीर सावरकर मैदान चे सुशोभीकरण करण्यात येईल, असे कौशिक शाह यांनी सांगितले.

# नगरसेविका अस्मिता घरत यांच्याकडून पाणीपुरवठ्याच्या तक्रारीची तत्काळ दखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नविन पनवेलमधील सेक्टर १७, पीएल ५ येथील इंद्रायणी सोसायटी, अष्टविनायक सोसायटी तसेच ई-वनमधील वरदविनायक सोसायटीतील नागरिकांकडून पाणीपुरवठा कमी दाबाने होत असल्याची तक्रार प्राप्त होताच नगरसेविका डॉ. अस्मिता जगदिश घरत यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

सदर परिसरात पनवेल महानगरपालिका मार्फत ड्रेनेज पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. या कामादरम्यान पाणीपुरवठ्याची पाइपलाइन तुटल्याने संबंधित इमारतींमध्ये पाण्याचा प्रवाह कमी झाल्याचे निदर्शनास आले.याबाबत डॉ. अस्मिता घरत यांनी महानगरपालिका पर्यवेक्षक तसेच संबंधित कंत्राटदारांशी चर्चा करून तातडीने दुरुस्तीचे



आदेश दिले.

काम योग्य पद्धतीने आणि त्वरीत पूर्ण करून नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत प्रशासनाशी समन्वय साधून त्वरित तोडगा काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# पनवेल मनपा शाळांमध्ये प्रभात फेरी

**पनवेल : रामप्रहर**

श्री. गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त भव्य हिंद-दी-चादरया ऐतिहासिक कार्यक्रमाचे आयोजन खारघर येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी महापालिकेच्यावतीने पालिकेच्या शाळांची पनवेल शहरात प्रभातफेरी काढण्यात आली. तसेच विविध उपक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे व शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम निमित्त महपालिकेच्यावतीने विविध कार्यक्रम घेण्यात येत आहे. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी पनवेल महानगरपालिका शाळा क्रमांक ६ धाकटा खांदा व शाळा क्रमांक ४,७,९,१०, ११ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये हिंद दी चादर कार्यक्रमाचे बॅनर हातात घेऊन, विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.

विद्यार्थ्यांना श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजींवर आधारित मानवंदना गीत व देशभक्ती गीते प्रेरणा गीते ऐकविण्यात आली. तसेच भिंती पत्रक निर्मिती, राष्ट्रीय एकात्मता जागृत करणारे सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

श्री गुरु तेग बहाद्दूर साहेबजी यांच्या महान कार्याची व अद्वितीय बलिदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला.

# गुरु लिंगेश्वर प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी रिपब्लिकन पार्टी युथ रिपब्लिकन चे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये गुरु लिंगेश्वर प्राथमिक शाळा यांचा वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ मार्केट यार्ड येथे झाला.

या कार्यक्रमाला सर्व शिक्षक वर्ग, पालक वर्ग, विद्यार्थी वर्ग व मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापकांनी महेश साळुंखे यांचे शाल व उच्च पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. महेश साळुंखे हे दरवर्षी या शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करीत असतात त्याचबरोबर इतर शैक्षणिक साहित्याचे सुद्धा वाटप करत असतात.



# एमएनएम विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करूनभिवादन केले. शाळेच्या प्राथमिक, माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी शिवजयंतीनिमित्त विशेष परिपाठाचे आयोजन केले. शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी कोपर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांनी केलेली भाषणे, पोवाडा यांचे उत्तम सादरीकरण करिता विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्रार्थमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी यांनी अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैत्राली कोळी यांनी केले तसेच आभार प्रदर्शन हर्षदा घरत यांनी केले.





**पनवेल : प्रलंबित मागण्यांसाठी जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय व अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या वतीने बुधवारी पनवेल पंचायत समिती कार्यालय परिसरात निदर्शने करण्यात आली.**

# युवासेनेतर्फे महापौरांना निवेदन

**पनवेल :** महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर नितीन पाटील आणि महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) युवासेना शिष्टमंडळाने नुकतीच भेट घेतली. या वेळी महापौरांचे स्वागत करून शहराच्या युवक हक्क आणि सुरक्षिततेच्या संदर्भात महत्त्वाच्या मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळाने शहरातील वाढती व्यसनाधीनता आणि प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न यावर सविस्तर चर्चा केली. या वेळी विधानसभा अधिकारी अजय पाटील, विधानसभा चिटणीस सुशांत सावंत, विधानसभा समन्वयक अरविंद कडव, महानगर चिटणीस जीवन पाटील, खांदा कॉलनी शहर चिटणीस सुयश बंडगर, शाखा अधिकारी आदिल शेख यांसह अनेक युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.



# गव्हाण विद्यालयात आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांची पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ब्रिटिश सरकारला हादरवून सोडण्यासाठी महान क्रांतिकारक आद्यक्रांतिगुरू लहुजी साळवे यांच्या तालमीतून प्रशिक्षण घेवून जाज्वल्य देशभक्तीने प्रेरित होऊन सशस्त्र क्रांतीचा लढा उभारणारे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

इयत्ता सहावी ब च्या वर्गांच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांच्या हस्ते आद्य क्रांतिवीरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, सहावी ब च्या वर्ग शिक्षिका शितल ठाकूर, रंजिता पाटील, शितलकुमार म्हात्रे, गितांजली म्हात्रे, दर्शना माळी, दर्शना म्हात्रे, प्रशांत परदेशी, कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी, शिक्षक व इयत्ता सहावी ब या वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते. बाल सभेच्या वतीने वर्गशिक्षिका शितल ठाकूर यांनी सर्व शिक्षकांना लेखणी भेट दिली.



## संपादकीय

# जुन्या मैत्रीचे नवे पर्व

भारत–फ्रान्स मैत्रीपूर्ण संबंध आधीपासूनच असून सर्वाधिक जुने आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. हे संबंध आता विशेष जागतिक सामरिक संबंधांत रूपांतरित झाले आहेत. भारत आणि फ्रान्स यांच्यातील द्विपक्षीय करार व्यापार, गुंतवणूक आणि गतिशीलता वाढावी यासाठी असून जगभरात आज दिसणारी अनिश्चितता पाहता जागतिक स्थैर्याच्या दृष्टीनेही हे एक सकारात्मक पाऊल म्हणावे लागेल.

**अलीकडच्या काळात भारताचा युरोपीय महासंघाशी झालेला मुक्त व्यापार करार आणि पाठोपाठ अमेरिकेबरोबर झालेला द्विपक्षीय अंतरिम व्यापार करार यामुळे भारतीय व्यापारउद्योग क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. त्यातच मंगळवारी भारत–फ्रान्स दरम्यान नव्या विशेष मैत्रीपर्वाची सुरुवात झाली. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन आणि त्यांच्या पत्नी ब्रिगेट यांचे सोमवारी मुंबईत आगमन झाले. भारत आणि फ्रान्समधील मैत्रीसंबंध ही विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी आहे. हे द्विपक्षीय संबंध केवळ धोरणात्मक नसून जागतिक प्रगतीच्या दृष्टीने देखील ते महत्त्वाचे आहेत. जगभरात अनिश्चिततेचा काळ सुरू असताना उभय देशांचे संबंध जागतिक स्थैर्य आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. व्यापार, गुंतवणूक आणि गतिशीलता वाढावी यासाठी भारत आणि फ्रान्सने करार केला आहे. हा करार उभय देशांतील लोकांचा प्रत्यक्ष सहभाग वाढवणारा असेल असा विश्वास फ्रान्सचे अध्यक्ष मॅक्रॉन यांनी व्यक्त केला आहे. भारत–फ्रान्स मैत्रीपूर्ण संबंध काही शतकांपासून असून सर्वाधिक जुने आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे आहेत. हे संबंध आता विशेष जागतिक सामरिक संबंधांत रूपांतरित झाले आहेत. राफेल लढाऊ विमाने, पाणबुड्या यांच्या निर्मितीत फ्रान्सचे सहकार्य सध्या भारताला लाभत आहेच. आता हेलिकॉप्टर निर्मितीतही हे सहकार्य लाभणार आहे. तसेच भारत आणि फ्रान्स यांचे मैत्रीसंबंध आणखी दृढ व्हावेत यासाठी फ्रान्सच्या विमानतळ परिसरातून जाण्यासाठी आजवर भारतीयांना लागत असलेला ट्रान्झिट व्हिसा लवकरच हटवला जाईल असेही मॅक्रॉन यांनी म्हटले आहे. यंदाचे वर्ष हे भारत–फ्रान्स मैत्रीवर्ष असल्याचा उल्लेख यावेळी मोदींनी केला तर भारत व फ्रान्स यांनी २०२६ हे वर्ष नाविन्य वर्ष म्हणून घोषित केल्याचे मॅक्रॉन यांनी सांगितले. द्विपक्षीय चर्चेनंतर संरक्षण सहकार्यासह एकूण २१ करार व सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. भारतीय आणि फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांच्या परस्पर नियुक्तीचाही करार करण्यात आला. तसेच हवामान बदलासारख्या आज अवघ्या जगासमोर एक मोठे आव्हान बनून उभ्या ठाकलेल्या प्रश्नावरही भारत आणि फ्रान्स एकत्र काम करणार आहेत. आजचे भूराजकीय जग हे आजवरच्या जगापेक्षा पूर्णपणे निराळे आहे. बदललेल्या जागतिक समीकरणांमध्ये आर्थिक असोत की औद्योगिक सर्व प्रकारच्या संबंधांमध्ये द्विपक्षीय संबंधांचे महत्त्व वाढले आहे. अलीकडच्या काळात अमेरिकेसोबतच्या संबंधांतील तणावांचा सामना भारताला मोठ्या प्रमाणात करावा लागला. वेगाने वाढणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेला आपला वाढीचा वेग कायम राखण्यासाठी अनेक देशांशी भागीदारीचे संबंध जोपासणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच अमेरिकेसोबतचा व्यापार करार लांबल्यानंतर भारताने युरोपियन युनियनसोबतचा मुक्त व्यापार करार प्राधान्याने प्रत्यक्षात आणला आणि आता फ्रान्ससोबत द्विपक्षीय करारावर स्वाक्षऱ्या करून भारताने कुठल्याही एकाच भागीदारावर अवलंबून राहण्याची जोखीम टाळली आहे. स्वायत्ततेचा आदर करणाऱ्या भारत आणि फ्रान्सने परस्पर विश्वास कायम जोपासला आहे. उभय देशांमधील ही दीर्घकालीन भागीदारी आता आणखी नव्या क्षेत्रांमध्ये निश्चितपणे विस्तारेल.**

# सह्याद्रीचा सिंह : छत्रपती शिवाजी महाराज



जाणता राजा, रयतेचा राजा म्हणून जगभरात दरारा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांची जयंती १९ फेब्रुवारी रोजी साजरी केली जाते. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, स्वभावातील सहिष्णुता, दूरदृष्टी, करारीपणा व धाडसी वृत्ती अशी अनेकविध गोष्टी आजही समाजाला प्रेरणा देतात. शिवाजी महाराजांपासून प्रेरणा घेत लोकमान्य टिळक स्वातंत्र्य संग्रामात सहाभागी झाले होते आणि त्यांनी शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली.

छत्रपती शिवाजी महाराज हे भारतीय इतिहासातील एक पराक्रमी, दूरदृष्टी असलेले लोकप्रिय शासक होते. १७व्या शतकात त्यांनी स्वराज्या स्थापना करून त्याचा विस्तार केला. शौर्य, चातुर्य आणि उत्कृष्ट युद्धनीतीच्या जोरावर शिवरायांनी स्वराज्याचा विस्तार केला. त्यांच्या प्रशासनात शिस्त, न्यायव्यवस्था आणि सुसंघटित लष्करचा समावेश होते. सर्व धर्मांचा आदर, स्त्रियांचा सन्मान आणि प्रजेला दिलेले संरक्षण ही त्यांच्या राज्याची वैशिष्ट्ये होती. छत्रपती शिवाजी महाराज आजही प्रेरणादायी नेतृत्वाचे प्रतीक मानले जातात.

छत्रपती शिवाजी महाराज हे असे महापुरुष होऊन गेले की, त्यांचे कार्य, पराक्रम आणि विचार यांची प्रेरणा अजूनही ताजी आहे. आजही आपण त्यांच्या काळासंदर्भात त्यांच्या स्वराज्य निर्मितीचा विचार करायला लागतो तेव्हा त्यांनी किती प्रतिकूल स्थितीत हे सतीचे वाण आपल्या हाती घेतले होते याचा अचंबा वाटतो.

छत्रपती शिवाजी महाराज ज्या प्रदेशात रहात होते तो प्रदेश आदिलशहाच्या अधिपत्याखाली होता. तेव्हा त्यांच्या विरोधात बंड करणे म्हणजे प्राणाशी गाठच असायची. डोळे फोडणे, मालमत्तेची राखरांगोळी करुन जबर दंड बसवणे, कुटुंबांसह जाळून हत्या करणे, तोफेच्या तोंडी देणे, कडेलोट करणे, हत्तीच्या पायाखाली चिरडून मारणे किंवा घोड्यांच्या पायांना बांधून फरपटत नेणे अशा अमानुष शिक्षा दिल्या जात असत. अशा शिक्षा भोगण्यापेक्षा त्यांच्या पायाशी शरण जाणे परवडेल अशी मानसिकता समाजात होती. पण शिवाजी महाराजांनी अशाही परिस्थितीत परकीयांची राजवट उलथून टाकून स्वत:चे राज्य निर्माण करण्याचा पण केला. हे त्यांचे महान कार्य आजही आपल्याला प्रेरणा देत असते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी एकदा साहस करण्याचा निर्धार केल्यावर कितीही संकटे आली तरीही आपल्या ध्येयापासून विचलित न होण्याचा त्यांचा गुणही असामान्यच होता. राजे निश्चयापासून ढळले असते तर सारे सहकारीही बिथरले असते. म्हणून खंबीरपणे उभे राहून महाराजांनी केवळ अडचणींना तोंडच दिले असे नाही तर त्या अडचणींतून मोठ्या कुशलतेने मार्गही काढले. महाराजांनी आपल्या सवंगड्यात स्वराज्य स्थापनेचा ध्येयवाद इतका पक्का रुजवला होता की, त्या ध्येयवादाच्या मार्गातून त्यांचे सहकारी कधीही ढळले नाहीत. शिवाजी महाराजांचे काही आप्त त्यांच्या विरोधात होते. पण तरीसुद्धा ते डगमगले नाही. स्वराज्यापायी आपल्या संसाराची वाताहत कशाला करुन घ्यायची? असा विपरीत विचार शिवाजी महाराजांनी केला नाही. शिवाजी महाराजांचे आयुष्य संघर्षमय होते. तरी त्यावर पाय रोवून उभे राहत महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली.

छत्रपती शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे होते. शिवाजी महाराज घोड्यांचा वापर निर्णायक प्रसंगी करत असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक मोहिमांमध्ये घोड्यांचा वापर नेमकेपणाने केला. शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास, तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे सात घोडे होते. कृष्णा या पांढऱ्या घोड्यावर शिवाजी महाराज राज्यभिषेकानंतर बसले होते. सुरतवर चढाई, आग्राहून सुटका अशा मोहिमांवर त्यांनी विजय मिळवला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करताना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वत: बांधले, तर काही किल्ले लढाया करुन जिंकले. महाराजांचे गड–किल्ले म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतीकच होते.

आजच्या घडीला शेकडो फूट बोअर करुनही पाणी लागत नाही. परंतु महाराजांच्या ४०० वर्षानंतरही महाराष्ट्रातील कुठल्याही किल्ल्यावर गेलो, तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावरील टाक्यांमधून स्वच्छ पाणी आढळते. या गड–किल्ल्यांवर कोणतीही पाईपलाईन असल्याचे दिसत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रत्येक किल्ल्यावर २ प्रकारचे हौद बांधले. एक खुले आणि दुसरे भूगर्भात किल्ल्यावरील पाण्याचे हौद वा टाक बांधकामात खडक फोडण्यासाठी दारुगोळा किंवा सुरुंग कधीच वापरले नाहीत. त्याऐवजी नैसर्गिक साधनांचा वापर करुन खडक फोडले. म्हणूनच टाक्यांचा आकार एकदम आयताकृती आहे. याच टाक्यांमधील पाणी संपूर्ण गडावर वापरले जायचे. ते पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी नैसर्गिक तंत्राचा वापर केला जायचा. पाण्याचे टाके ५० ते १५० फुट खडकापर्यंत खोल कोरलेले आहेत. वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाइन करुन राजगड बांधल्याचे सांगितले जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात अष्टप्रधान मंडळाचे महत्त्व अनन्यसाधारण होते. जगाच्या इतिहासात हा एकमेव राजा आहे, ज्याच्या दरबारी कधी स्त्री किंवा नर्तकी नाचली नाही. छत्रपती शिवाजी महाराज अतिशय चारित्र्यसंपन्न होते. महाराजांनी स्वत:साठी मोठे महाल बांधले नाहीत. सत्तेचा वापर स्वत:च्या किंवा कुटुंबाच्या फायद्यासाठी केला नाही. शिवाजी महाराज नेहमी ‘रयतेचं स्वराज्य’ असाच शब्द वापरत.

महाराष्ट्राच्या किनार पट्टीवर १६७१ मध्ये मीठ शेती केली जायची. परंतु इंग्रज, डच, पोर्तुगीज यांनी तेथील शेती मोडीत काढण्यासाठी गोवा प्रांतातून मीठ आणून त्याची स्वस्तात विक्री सुरु केली, हे लक्षात आल्यावर महाराजांनी आयात मिठावर कर लावला, त्यामुळे आयात मीठ महाग झाले व आपल्या शेतकऱ्यांच्या मिठाची मागणी वाढली. रयतेच्या विचारांचे निर्णय म्हणजे जाणता राजा.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले हाच केवळ त्यांचा मोठेपणा आहे असे नाही, तर त्यांनी शुन्यातून स्वराज्य निर्माण केले आणि अक्षरश: मुठभर सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी इतिहासदत्त कार्य केले. मध्ययुगामध्ये अनेक राजे, महाराजे आणि सुलतान होऊन गेले त्यांच्याशी तुलना केली असता शिवाजी महाराजांचे स्वराज्य विस्ताराने फारसे मोठे नव्हते. प्रजेला कसलाही त्रास होऊ नये, याबाबत शिवाजी महाराज कमालीचे दक्ष होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून स्वराज्याचा कारभार शिस्तबद्ध केला. स्त्रियांचा सन्मान, शेतकऱ्यांचे हित आणि धार्मिक सहिष्णुता ही त्यांच्या राज्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती. भारतीय नौदलाचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराजांनी समुद्रावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी आरमार उभे केले आणि अनेक जलदुर्ग बांधले. रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, अशी आज्ञा देणारा हा ’जाणता राजा’ आजही जगभरातील लोकांसाठी प्रेरणेचा सर्वात मोठा स्रोत आहे.

भूमीवर अधिपत्य गाजवणारे अनेक भूपती या जगती जन्मले आणि मेले, परंतु करोडो हृदयावर अधिपत्य गाजवणारे एकच शिवछत्रपती अवतरले !! छत्रपती शिवाजी महाराज...

गगन भेदी नजर ज्याची,
पहाड सम विशाल काया !!
धगधगता सुर्य ही झुकतो
वंदितो तुला शिवराया !!!

**–कविता फाले–बोरीकर**



## बदलते तंत्रज्ञान

# एका कॉलवर सायबर चोरटे साफ करतात बँक खाते

भारतात सायबर गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ होत असल्याचे पाहायला मिळत आहे. सायबर गुन्हेगार



सतत फसवणुकीसाठी वेगवेगळया पद्धीत अवलंबतात. भारतात आता सायबर गुन्हेगारांनी सर्वसामान्यांना फसवण्यासाठी कॉल मर्जिंग स्कॅम या नव्या पद्धतीचा वापर सुरू केला असून, त्याद्वारे ते पीडितांना लक्ष्य करत आहेत. यामध्ये सायबर गुन्हेगार ओटीपी मिळविण्यासाठी कॉल मर्ज करतात आणि ग्राहकाचे खाते रिकामे होते.

या पद्धतीने फसवणूक करण्यासाठी सायबर चोरटे ज्या व्यक्तीला लक्ष्य करू इच्छितात त्यांना फोन करतात, त्यांना एखाद्या कार्यक्रमात उपस्थित राहण्यास किंवा नोकरीसाठी विचारपूस करतात. यावेळी ते पीडिताला सांगतात की, त्यांना त्यांचा फोन नंबर मित्राकडून मिळाला आहे. दरम्यान पहिला फोन सुरू असतानाच पीडिताला दुसरा फोन येतो, तेव्हा पहिल्या फोनवरील व्यक्ती म्हणते की, तुमचा मित्र तुम्हाला दुसऱ्या नंबरवरून कॉल करत आहे. हे ऐकून पीडित जसा दुसरा फोन उचलून मर्ज करतो त्याच क्षणाला त्याच्या बँक खात्यातून पैसे साफ होतात.

दरम्यान, सायबर गुन्हेगाराचा पहिला फोन सुरू असताना दुसरा आलेला फोन ओटीपी साठी असतो. जेव्हा दुसरा कॉल येतो तेव्हा त्या व्यक्तीला ओटीपी ऐकू येतो आणि त्यामुळे खाते रिकामे होते. दरम्यान ‘ओटीपी व्हाया कॉल’ या पर्यायामुळे सायबर चोरट्यांना लोकांची फसवणूक करण्याची आणखी एक पद्धत सापडली आहे.दरम्यान सायबर फसवणुकीच्या या नव्या पद्धीतीपासून वाचरण्यासाठी यूपीआयने काही सूचना जारी केल्या आहेत.

कधीही अज्ञात नंबरसह कॉल मर्ज करू नका. जेव्हा कॉल मर्ज करण्यास सांगितले जाते तेव्हा नेहमी सावधगिरी बाळगा, विशेषतः जेव्हा समोर बोलणारा व्यक्ती अनोळखी असतो. जर कोणी तुमचे खाते असलेल्या बँकेतून किंवा ओळखीच्या लोकांच्या संपर्कातून बोलत असल्याचा दावा करत असेल, तर कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी त्यांची ओळख पटवा. जर तुम्ही करत नसलेल्या व्यवहारासाठी ओटीपी आला तर, तुमच्या बँकेला याची तक्रार देण्यासाठी त्वरित १९३० वर कॉल करा.

# समाजसेवक गोपाळ कृष्ण गोखले



## निमित्त

गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचा जन्म ९ मे, १८६६ रोजी महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यात कोतळूक येथे झाला.ह्यांच्या वडिलांचे नाव कृष्ण महादेव गोखले आणि आईचे नाव सत्यभामाबाई कृष्ण गोखले होते. त्यांचे वडील शेतकरी होते. ह्यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे गेले. इथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण देखील झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वडिलबंधूं गोविंदराव ह्यांनी स्वतःचे शिक्षण सोडून पत्नीचे दागिने विकून गोपाळ कृष्ण गोखले ह्यांना उच्चशिक्षणास कोल्हापुरातील राजाराम कॉलेज आणि मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजात पाठविले.

१८८४ मध्ये गणित विषयात बीए ची पदवी मिळवून जानेवारी १८८५ मध्ये पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षकाची नौकरी स्वीकारली.नंतर पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व,फर्ग्युसन कॉलेजात अध्यापन, १८९५ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून नियुक्त झाले.

भारतातील इंग्रजी सत्ता म्हणजे दैवी वरदान आहे असे मानणाऱ्या गोपाळ कृष्ण गोखले यांनी सनदशीर राजकारणाला तात्त्विक आणि व्यावहारिक मान्यता दिली. महात्मा गांधींनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात करताना गोपाळकृष्ण गोखले यांना आपले गुरू मानले. गोपाळ कृष्ण गोखले हे कुशल राजकारणी होते. राजकारणाच्या प्रति त्यांचा दृष्टिकोण उदारमतवादी होता. राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणावयाचे असेल तर घटनात्मक मार्गाचाच अवलंब केला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस च्या सार्वजनिक सभेचे सचिव बनले .ह्यांनी शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ या त्रासांचा सखोल अभ्यास करून सरकार कडे निवेदन पाठविले .१९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.गोखले पुण्यात न्यायमूर्ती रानडे ह्यांच्या संपर्कात आले. ते रानडे ह्यांच्या आर्थिक आणि राजकीय विचारांशी खूप प्रभावित झाले.न्यायमूर्ती रानडे एक महान देशभक्तआणि समाज सुधारक होते. गोपाळ गणेश आगरकर ह्यांनी सुरू केलेल्या ’सुधारक’ च्या इंग्रजी आवृत्तीची जबाबदारी नामदार गोखले ह्यांनी सांभाळली.सार्वजनिक सभा,वृत्तपत्रातून ते लिखाणाद्वारे समाज सुधारणांचा पाठपुरवठा सतत करायचे.

१९०२ साली मध्यवर्तीय कायदेमंडळावर निवड झाल्यावर ते नामदार झाले. त्यांच्यातील क्षमतेला बघून व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो ह्यांनी गोखले ह्यांना मोर्ले–मिंटो सुधारणा कायद्याचा मसुदा तयार करण्यास सांगितले.ते भारतातील पहिल्या श्रेणीचे अर्थतज्ज्ञ होते. आपला साधा स्वभाव, बौद्धिक क्षमता आणि देशासाठी दीर्घकाळ निःस्वार्थ सेवा करण्यासाठी त्यांना नेहमी स्मरले जाईल.

ते इंडिया पब्लिक सर्व्हिस सोसायटीचे संस्थापक आणि अध्यक्ष होते. ते उदारमतवादी विचारसरणीचे अग्रगण्य घटक होते.ते १९०५ मध्ये स्वातंत्र्याच्या पक्षात लाला लाजपतराय ह्यांचा सह इंग्लंडला गेले आणि अतिशय प्रभावी पणे देशाच्या स्वतंत्रते बद्दल बोलले. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचे निधन झाले. साभार : इंटरनेट

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# फेअरनेस क्रीमचा होतो किडनीवर गंभीर परिणाम

फेअरनेस क्रीम्स मोठ्या प्रमाणात वापरल्या जा–तात पण, तपासणीशिवाय बाजारात विकल्या जाणाऱ्या क्रीम्स तुमच्या त्वचेसाठी सुरक्षित नसतात. त्यात पाऱ्यासारखे हानिकारक पदार्थांचे प्रमाण जास्त असते, जे मूत्रपिंडावर गंभीर परिणाम करतात. तसेच त्यातील ग्लुटाथिओनचे अधिक प्रमाणदेखील किडनी आणि मूत्रपिंडासाठी हानिकारक आहे.



फेअरनेस क्रीम्सच्या वापरानंतर मूत्रातून प्रथिनगळती होण्याचे लक्षण असलेल्या नेफ्रॉटिक सिंड्रोमची प्रकरणे आढळून आली. परंतु, रुग्णांनी वापरलेल्या सर्व क्रीम्समध्ये लेबल, ब्रँडचे नाव किंवा त्यांच्यात वापरलेल्या घटकांबद्दलची माहिती नव्हती. या रुग्णांच्या रक्तातील पाऱ्याची पातळी वाढल्याचे दिसून आले. त्यावरून असे दिसून येते की, या फेअरनेस क्रीम्सची कुठलीही तपासणी केली गेलेली नव्हती आणि नियामक एजन्सीने त्या प्रमाणित केलेल्याही नव्हत्या. त्यामुळे या क्रीम्समध्ये पाऱ्याचे प्रमाण मर्यादेपलीकडे होते. त्यामुळे या क्रीम्स वापरणाऱ्या लोकांच्या त्वचेद्वारे पारा शरीरात शोषला गेला आणि त्यांना किडनीसंबंधित समस्या जाणवू लागल्या.

या क्रीम्समध्ये रासायनिक पदार्थच इतके वापरले जातात की, ज्यामुळे त्वचेसह शरीरातील इतर अवयवांवरही त्याचा परिणाम होत असतो. जेव्हा पारा त्वचेद्वारे शोषला जातो तेव्हा तो मूत्रपिंडांपर्यंत पोहचतो आणि मूत्रपिंडाच्या शुद्धीकरण प्रक्रियेत गडबड निर्माण करतो. त्यामुळे शरीराच्या स्वतःच्या उतींना आणि मूत्रपिंडात असलेल्या प्रथिनांना लक्ष्य करणाऱ्या अँटीबॉडीजचे उत्पादन सुरू होते. परिणामी रोगप्रतिकार शक्तीवर विपरीत परिणाम होतो. हे असेच सुरू राहिल्यास भविष्यात मूत्राशयासंबंधित आजारांचा धोका अधिक वाढतो.

केरळमधील प्रकरणांतून असे लक्षात आले की, बहुतेक रुग्णांनी फेअरनेस क्रीम वापरणे बंद केल्याने मूत्रमार्गातील प्रथिनाच्या गळतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होते. रुग्णांच्या एका लहान गटाला ऑटो–अँटीबॉडी उत्पादन रोखण्यासाठी आणि मूत्रपिंडाचे पुढील नुकसान कमी करण्यासाठी रोगप्रतिकार–दमन थेरपीची आवश्यकता असू शकते. या प्रक्रियेदरम्यान, मूत्रमार्गातील प्रथिनांची पातळी नियंत्रित करण्यासाठी अँटीहायपरटेन्सिव्ह औषधे आणि नॉन–इम्युनोसप्रेसिव्ह औषधे दिली जातात.

# परीक्षांच्या हंगामाचा पर्यटनावर मोठा परिणाम

## श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर शुकशुकाट; पर्यटकांची प्रतीक्षा

**श्रीवर्धन : बातमीदार**

सध्या दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू झाल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या अत्यंत कमी झालेली पाहायला मिळत आहे. त्यामुळे श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावर पूर्णपणे शुकशुकाट पाहायला मिळत आहे. आता पर्यटक येतील ते फक्त शनिवारी आणि रविवारी. त्यानंतर एप्रिल महिन्यात शालांत परीक्षा सुरू होतील. शालांत परीक्षा संपल्यानंतर पुन्हा पर्यटकांचा सीझन सुरू होईल. यावर्षी श्रीवर्धन तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांकडून अनेक वेळा अपघात घडण्याचे प्रकार खूप मोठ्या प्रमाणावरती वाढले आहेत. त्याचप्रमाणे



पर्यटकांचा मद्यपीपणा देखील या अपघातांसाठी कारणीभूत ठरत असल्याचे अनेक वेळा दिसून आले आहे.

यावरती पोलीस प्रशासनाने कडक भूमिका घेतली असून श्रीवर्धन मध्ये येणाऱ्या पर्यटकांची मशीनद्वारे तपासणी करण्यात येणार आहे. या शनिवारी देखील श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती एका काजू विकणाऱ्या ७० वर्षाच्या आदिवासी महिलेला एका पर्यटकानी धडक दिल्याची घटना घडली होती. श्रीवर्धन पोलिसांनी त्यामुळे जागोजागी बंदोबस्त वाढविला असून शहरात सुरू असलेली अवजड वाहतूक देखील स्थानिक नागरिकांना डोकेदुखी ठरत आहे. जीवना बंदर व श्रीवर्धन दांडे या ठिकाणी सुरू असलेल्या जेट्टीच्या कामासाठी क्षमतेपेक्षा जास्त दगड भरून ओव्हरलोड वाहतूक श्रीवर्धन शहरातून केली जाते.

या वाहतुकीमुळे श्रीवर्धन शहरातील रस्त्यांची पूर्णपणे वाट लागली आहे. सदर जेट्टी बांधण्याचा ठेका फोरकॉन इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने घेतला असून सदर कंपनीने नगरपालिकेकडून अवजड वाहतूक करण्याची परवानगी घेतली आहे का? तर नगरपालिकेने रस्त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त वाहतूक होत असल्याने सदर ठेकेदार कंपनीला नोटीस देणे गरजेचे होते, मात्र नगर परिषद प्रशासनात पूर्णपणे सावळा गोंधळ सुरू असल्यामुळेच श्रीवर्धन शहरात व परिसरात अशा प्रकारच्या घटना घडत आहेत.

**स्थानिक**
***अर्थव्यवस्थेला फटका***

*पर्यटकांची संख्या कमी झाल्याने स्थानिक रोजगारावर परिणाम झाला आहे.बीचवर घोडेस्वारी, बोटिंग सेवा देणाऱ्यांचे उत्पन्न घटलेनारळपाणी, आईस्क्रीम व स्नॅक्स विक्रेत्यांची विक्री कमीस्थानिक बाजारपेठेत खरेदी कमी प्रमाणात यामुळे संपूर्ण पर्यटन साखळीवर परिणाम होत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडे उन्हाळी सुट्टीत विशेष प्रचार मोहीम राबवण्याची मागणी केली आहे.*

# शिवजयंतीनिमित्त खोपोलीत पोलिसांचे पथ संचलन



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात भव्य दिव्य स्वरूपात साजरे होणारे शिवजयंतीसाठी खोपोलीतील विविध मंडळ सज्ज झाले असून, पोलीस विभागाने देखील खोपोली शहरात पथ संचलन करत कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. शिवजयंतीला खोपोली शहरात रात्री बारा वाजता भव्य अशी महाआरती होते. तालुक्यातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने महा आरतीसाठी येतात. मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या मध्यभागी शिळफाटा खोपोली येथे अश्वारूढ पुतळा परिसरात शिवजयंती उत्सव साजरा होत असल्याने पोलीस प्रशासन विशेष काळजी घेत असते. खोपोली पोलिस पोलिस निरीक्षक सचिन हिरे, पोलीस पथकाने खोपोली शहरातून पथ संचलन केले.


**GENERAL EDUCATION INSTITUTE'S**
**ENGLISH MEDIUM SCHOOL, URAN**
Admission Open
FOR ACADEMIC YEAR
2026-2027
For Std-1 st
RTE Forms-Online Form
17 Feb. 2026 to 28 Feb. 2026
Website: http://student.maharashtra.gov.in
Contact: Head Mistress
G.E.I.'s English Medium School, Uran.
(Pre-Primary/Primary Section)
Ph. No.7208642983


# 'समाजबंध'तून महिलांच्या आरोग्याला साथ



**पाली : प्रतिनिधी**

समाजातील गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी आणि आदिवासी महिलांच्या आरोग्यासाठी 'समाजबंध' संस्था व शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय (पाली–सुधागड) यांच्या संयुक्त विद्यमाने एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षातर्फे सोमवार (ता. १६) ते शनिवार (ता. २१) या कालावधीत 'जुने कपडे संकलन शिबिर' आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराद्वारे गोळा करण्यात आलेल्या कपड्यांचा वापर 'समाजबंध' संस्थेच्या 'कापडी सॅनिटरी पॅड' निर्मिती प्रकल्पासाठी केला जाणार आहे. सुती कपडे, होजिअरी आणि जीन्सपासून हे सॅनिटरी पॅड्स तयार केले जातात. तयार केलेले हे पॅड्स आदिवासी महिलांमध्ये मासिक पाळीबाबत जनजागृती करून त्यांना विनामूल्य वाटले जातात. तसेच, जे कपडे वापरण्यायोग्य असतील, ते थेट गरजूंपर्यंत पोहोचवले जाणार आहेत.

आयोजकांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्याकडील जुने परंतु स्वच्छ आणि वापरण्यायोग्य कपडे, साड्या, तसेच जीन्स शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालय येथील संकलन केंद्रावर आणून द्यावेत. कपड्यांव्यतिरिक्त इतर शैक्षणिक साहित्याचीही गरज असून नागरिक खालील वस्तूही दान करू शकतात. ज्यामध्ये शैक्षणिक साहित्य (वह्या, पेन इ.), पेपर रद्दी यांचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी सपर्क डॉ. सर्जेराव पाटील, डॉ. अनिल झेंडे आणि श्री. लिंताज ऊके राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी. आपल्या घरातील अडगळीत पडलेल्या वस्तू एखाद्याच्या आयुष्यात मोठा बदल घडवू शकतात. त्यामुळे जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आपले योगदान द्यावे, अशी विनंती महाविद्यालयातर्फे करण्यात आली आहे.

# हर्षवर्धन सपकाळ यांचा महाडमध्ये जाहीर निषेध

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना टिपू सुलतान या कृर शासकाबरोबर केल्याप्रकरणी महाराष्ट्रामध्ये काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात महाराष्ट्रात अनेक ठिकाणी निषेध आंदोलने झाली. महाड भाजपच्या वतीने देखील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे त्यांच्या फोटोला जोडे मारून व जाळून त्यांचा निषेध करण्यात आला.

मालेगाव महानगरपालिकेतील उपनगराध्यक्ष यांच्या दालनातील टिपू सुलतान या जाचक व जुलमी शासकाचा फोटो लावल्या प्रकरणी संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये तीव्र संतापाची लाट निर्माण झाली होती. त्याचवेळी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या अकलेचे तारे



तोडत, टिपू सुलतान या जुलमी शासकाची छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सोबत तुलना केल्याने महाराष्ट्रात हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात अनेक निदर्शने करण्यात आली.

बुधवार सकाळी महाड भाजपाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे हर्षवर्धन सपकाळ यांच्या विरोधात घोषणाबाजी करत भाजपचे महिला व कार्यकर्ते उतरले होते. दरम्यान यावेळी हर्षवर्धन सपकाळ यांच्या फोटोला जोडे मारून त्यांच्या प्रतिमेचे दहन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र भाजपाचे परिषद सदस्य बिपीन महामुणकर, उत्तर मंडळ तालुका अध्यक्ष निलेश देवगिकर, नगरसेवक सुरज बामणे, महेश शिंदे, चंद्रजीत पालांडे, सुनील सोंडकर, शुभम भावेकर, विश्वतेज भोसले, पवार, सपना नाझरे, आशा चोराट, स्नेहल महामुणकर, रूपाली पवार, हर्षदा शेठ, आशिष पवार कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यातील माझी वसुंधरा अभियानात खालापूर तालुक्यातील आठ ग्रामपंचायतींना पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान ५.० या राज्य स्तरीय अभियानात खालापूर तालुक्यातील आठ ग्राम पंचायत यांना नऊ पुरस्कार मिळाले असून राज्यात आणि विभागात प्रथम क्रमांक प्राप्त झाले आहेत. गट विकास अधिकारी संदीप कराड यांचे विशेष अभिनंदन होत आहे,हे पुरस्कार सर्वांच्या मेहनतीने प्राप्त झालेले आहेत, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

माझी वसुंधरा हे अभियान महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे चालवलेले एक प्रमुख अभियान आहे, ज्याचा मुख्य उद्देश पर्यावरणाचे जतन, संरक्षण व संवर्धन करणे हा उद्देश आहे. हे अभियान निसर्गाच्या पंचमहाभूतांवर म्हणजे भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश यावर लक्ष केंद्रित करून होत, असलेल्या हवामान बदलाचा सामना करण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि मनुष्याच्या शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी केला आहे. हे अभियान स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे ग्राम पंचायत,समाजसेवी संस्था आणि सामान्य नागरिकांना एकत्र आणून शाश्वत विकासाकडे वाटचाल करण्यासाठी काम करते.खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत वडगांव व शिरवली यांनी राज्यात प्रथम क्रमांक मिळवला असून प्रत्यकी एक कोटी रुपयांचे पारितोषिक जिंकले आहे.ग्रुप ग्रामपंचायत वासंबे ,चौक, तांबाटी ,तुपगाव, वडवळ व नारंगी यांनी पन्नास लाख रुपयांचे पारितोषिक जिंकले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत शिरवली यांनी भूमी जतन हा माझी वसुंधरा अभियान अंतर्गत कार्यक्रम करून राज्यात प्रथम येऊन पन्नास लाखाचे बक्षीस जिंकले आहे. आज गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी सर्व सरपंच ग्राम पंचायत अधिकारी यांचे विशेष अभिनंदन केले असून छोटेखानी कार्यक्रमात पेढे वाटून आनंद व्यक्त केला.



# राज्यस्तरीय भूगोल स्पर्धेत नांदगाव हायस्कूलचे सुयश

**मुरूड : प्रतिनिधी**

भूगोल अभ्यास व परीक्षा केंद्र नवी मुंबई यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगावने बाजी मारलेली आहे. या स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाचे एकूण ३१८ विद्यार्थी सहभागी झाले होते त्यापैकी इयत्ता नववीची विद्यार्थिनी आर्या दिनेश वाडकर ही राज्यस्तरीय गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी यादीमध्ये तृतीय व जिल्ह्यात प्रथम क्रमांक आलेले आहेत. हिला १०० पैकी ९८ गुण मिळाले आहेत. तिला गोल्ड मेडल व प्रशस्तीपत्र मिळाले तसेच इयत्ता दहावीची विद्यार्थिनी निधी नितीन पवार हिला १०० शंभर पैकी ९४ गुण मिळाले आहेत. हिला सिल्वर मेडल मिळाले असून प्रशस्तीपत्र मिळाले आहे.तसेच इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी आनवी निलेश बिरवाडकर हिला १०० शंभर पैकी ८८ गुण मिळाले आहेत. हिला ब्रांज मेडल व प्रशस्तीपत्रक मिळाले आहे त्याचप्रमाणे पाचवी तील विद्यार्थ्यांनी स्वरांगी राऊत हिला ७० गुण मिळाले आहे. सातवीची विद्यार्थिनी परी मिलिंद कुमरोटकर हिला ८४ गुण मिळाले आहेत तसेच इतर सर्व विद्यार्थी पात्र झालेले आहेत. भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा तर्फे या शाळेतील मुख्याध्यापिका अर्चना खोत व पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांना सुद्धा सहभागी विद्यार्थ्यांसाठी प्रशस्तीपत्र दिले आहे.




**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा शासकीय रुग्णालय, रायगड-अलिबाग**
**अलिबाग-४०२ २०१.**
Emai ID: csraigad70@gmail.com
**ई-निविदा सुचना**

जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग हे जिल्हा रुग्णालय अलिबाग व अधिपत्याखालील उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालयाकरीता यंत्रसाहित्य साधन सामग्री व तसेच Patient Transfer Device Set खरेदीसाठी ई निवीदा मागविणे बाबतची जाहीरात वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करावी

जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड अलिबाग हे जिल्हा रुग्णालय अलिबाग वअधिपत्याखालील उपजिल्हा / ग्रामीण रुग्णालयाकरीता यंत्रसाहित्य साधन सामग्री व तसेच Patient Transfer Device Set साहीत्य पुरवठा करण्यास इच्छुक असलेल्या / निविदा धारकांना निविदेतील अटि व शर्ती, निविदा संदर्भात वेळापत्रक इ. माहीती शासनाच्या Website :- gem.gov.in वर उपलब्ध होतील. प्रस्तुत निविदा मान्य करण्यांचा अथवा कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा अमान्य करण्यांचा अधिकार खाली स्वाक्षरी करणा–या अधिका–याने राखून ठेवला आहे.

आरओसी–२०२५–२६/क्र.–५/सी६०४६

**सही/–**
**जिल्हा शल्यचिकित्सक,**
**रायगड अलिबाग**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, ता. – पनवेल, जिल्हा – रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**
मौजे पोयंजे, ता. पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | |
| ३१/७ | १ | ०–१९–२० | ०–००–०० | ०–१९–२० | ०.३७ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन २१ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०२/२०२६

**सही/–**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
**RAMSHETH THAKUR PUBLIC SCHOOL, ULWE**
CBSE Affiliation No. 1131483 School Code: 31472 UDISE No. 27244100042
**Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Tal. - Panvel, Dist. - Raigad - 410206.**
**Contact No. 022-27212067, 77100072762,**
**Email: rtpsulwe@gmail.com, Website: www.rtpsulwe.com**

**STAFF RECRUITMENT**

**Applications are invited for the following positions for appointment in the Academic Year 2026-27**
**As our institution continues to grow, we are seeking passionate and dedicated educators who are committed to inspiring young minds and contributing to our vision of academic excellence.**

| POST & SUBJECT | No. of position | QUALIFICATIONS & ELIGIBILITY |
|---|---|---|
| TGT<br>English (1)<br>Hindi (1) | 2 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) is mandatory<br>• Prior teaching experience in a CBSE school is mandatory<br>• CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| Teacher cum Assistant Co-ordinator (Pre-Primary) | 1 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor in Education (B.Ed.) or Early Childhood Care & Education (E.C.C.Ed.) is Mandatory<br>• 3 Years of experience in a CBSE school is preferred |
| PRT<br>English (2)<br>Hindi (1)<br>Marathi (1)<br>Science (1)<br>Social Science (1) | 6 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Bachelor of Education (B.Ed.) is mandatory<br>• Prior teaching experience in a CBSE school is preferred<br>• CTET (Central Teacher Eligibility Test) qualification is preferred |
| Dance Teacher | 1 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• B.P.A. |
| Art & Craft Teacher | 1 | • Graduate or Post-Graduate with a minimum of 50% marks<br>• A.T.D./ B.F.A./ M.F.A./ Diploma in Fine Art/Painting / Drawing & painting |
| Music Teacher | 1 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• Sangeet Visharad or BA in Music followed by a 2 Years Diploma/ Certificate in Music |
| Librarian | 1 | • Graduate or Post-Graduate in the relevant subject with a minimum of 50% marks<br>• B.LIB / M.LIB is mandatory<br>• 3 Years of experience in a CBSE school is preferred |

**Note :** To apply, interested candidates should submit their resume/cv, a passport-sized photograph and self-attested copies of all relevant documents (Academic credentials). Applications can be sent via post to the **Chairman, JBSP Sanstha, Ramsheth Thakur Public School, Ulwe at Plot No. 01 & 02, Sector-12, Ulwe, Navi Mumbai - 410206.**

Alternatively, applications may be submitted by email to
**rtpsulwe@gmail.com**

**The deadline for all submissions is Saturday, 28th February, 2026.**

For Additional Information Contact : **7710072762 / 7710090800**

**Shri. Ramsheth Thakur (Ex. M.P.)**
Chairman, Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha, Panvel



**जाहीर प्रसिध्दीकरण**

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२६–२७ ते २०३०–३१ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. १९/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नावः **गोल्फ मेडोस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड.** सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २०/०२/२०२६ ते २५/०२/२०२६, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक २६/०२/२०२६, नामनिर्देशन माघारी दि. २८/०२/२०२६ ते १४/०३/२०२६ व आवश्यकतेनुसार मतदान दि. २२/०३/२०२६ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, **गोल्फ मेडोस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड.** कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

**सही/–**
**संदेश नंदकुमार महाडीक निवडणूक निर्णय अधिकारी प्राधिकृत अधिकारी, कोकण विभाग पॅनल अ.क्र. वर्ग 'क' ०६/'ई' ०९ गोल्फ मेडोस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित खानावळे, ता. पनवेल, जि. रायगड**

# ई-गव्हर्नन्स क्षेत्रात नवी मुंबई महानगरपालिका राज्यात प्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या ई-गव्हर्नन्स कामगिरीचे सर्वंकष मूल्यमापन करणाऱ्या पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन पुणे या त्रयस्थ संस्थेमार्फत जाहीर करण्यात आलेल्या City E-Governance Index 2026 अहवालामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांकाचे स्थान पटकावून डिजिटल प्रशासनाच्या क्षेत्रात ऐतिहासिक यश संपादन केले आहे.



पॉलिसी रिसर्च ऑर्गनायझेशन पुणे यांनी प्रसिद्ध केलेल्या या अहवालामध्ये सेवा उपलब्धता, प्रशासनातील पारदर्शकता आणि डिजिटल सुलभता या तीन प्रमुख स्तंभांवर आधारित शेकडो निकषांच्या आधारे मूल्यांकन करण्यात आले. यामध्ये पुणे महानगरपालिका दुसऱ्या क्रमांकावर आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची ही कामगिरी केवळ एक क्रमांक नसून ती आधुनिक, नागरिकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाची साक्ष आहे. डिजिटल इंडिया, महाराष्ट्र ई-गव्हर्नन्स धोरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनाशी सुसंगत अशा अनेक उपक्रमांमुळे हे यश शक्य झाले आहे.

महानगरपालिकेच्या विविध नागरिकाभिमुख ऑनलाइन सेवा, सुलभ डिजिटल व्यवहार, कार्यक्षम तक्रार निवारण प्रणाली तसेच www.nmmc.gov.in ही वेबसाईट आणि My NMMC या मोबाईल अॅपद्वारे उपलब्ध माहितीची सुसंगतता आणि अद्ययावतपणा यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेला हा मानाचा प्रथम क्रमांक प्राप्त झालेला आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या या मानांकनाबद्दल महापौर सुजाता पाटील, उपमहापौर दशरथ भगत व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाचे कौतुक करीत महानगरपालिकेच्या यशाबद्दल नागरिकांचे अभिनंदन केले आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी २४७ ऑनलाईन सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. नागरिक आता घरबसल्या प्रमाणपत्रे मिळवू शकतात, कर भरू शकतात, तक्रारी दाखल करू शकतात आणि त्यांच्या अर्जाची स्थिती ट्रॅक करू शकतात.

मागील वर्षांत नवी मुंबई महानगरपालिकेने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ई-गव्हर्नन्स क्षेत्रात सातत्यपूर्ण सुधारणा करत नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ ऑनलाईन सेवा देण्यावर विशेष भर दिला आहे. डिजिटल माध्यमांतून सेवा विस्तार, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, ट्रॅकिंग सुविधा, तसेच नागरिकांच्या सहभागासाठी विकसित करण्यात आलेल्या विविध प्लॅटफॉर्म्सचा सकारात्मक परिणाम या निर्देशांकात दिसून आला आहे.

नवी मुंबई महानगरपालिका नागरिकांना अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि सुलभ सेवा उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून ई-गव्हर्नन्समध्ये राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये प्रथम क्रमांकाचे हे यश भविष्यातील नव्या उपक्रमांना अधिक गती देणारे ठरेल.

**समन्वयात सुधारणा**

महानगरपालिकेने ई-ऑफिस प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करून पेपरलेस प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली आहे. फाईल हालचाली, मंजुरी प्रक्रिया आणि नोंदी डिजिटल माध्यमातून केल्या जात आहेत. विविध विभागांचे एकत्रित व्यवस्थापन करण्यासाठी ERP आधारित प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे विभागांमधील समन्वयात सुधारणा झालेली आहे.

# नावडेमध्ये फुटपाथवरील अतिक्रमण, अनधिकृत शेडवर तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आज दिनांक १७ फेबुवारी रोजी प्रभाग समिती - अ खारघर उपविभाग नावडे हद्दीतील सेक्टर - ३४,३५ तसेच फेज -२ येथील बेकायदेशीर झोपडे, रस्ते तसेच फुटपाथ वरील बेकायदेशीर, चिकन विक्री शेड, फेरीवाले यांच्यावर तोडक कारवाई करण्यात आली तसेच साहित्य जप्त करण्यात आले



महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती अ मध्ये सहायक डॉ. रूपाली माने व प्रभारी अधिक्षक अरविंद पाटील यांच्या देखरेखीखाली अनधिकृत झोपड्या, रस्ते तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर शेड, हातगाड्या,भाजीवाले, फेरीवाले अतिक्रमण विभागाच्या सह्याने ही कारवाई केली.

# पनवेल-अलीपूरद्वारदरम्यान अमृत भारत एक्सप्रेस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मध्य रेल्वे द्वारा पनवेल - अलीपूरद्वार - पनवेल अमृत भारत एक्सप्रेसची नियमित सेवा दिनांक २३.०२.२०२६ पासून सुरू करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडे आयोजित कार्यक्रमात या गाडीच्या उद्घाटन फेरीस हिरवा झेंडा दाखवला होता.

१. पनवेल - अलीपूरद्वार - पनवेल अमृत भारत एक्सप्रेस (साप्ताहिक) ट्रेन क्रमांक ११०३१ दिनांक २३.०२.२०२६ पासून पनवेल येथून दर सोमवारी ११.५० वा. सुटेल व अलीपूरद्वार येथे तिसऱ्या दिवशी १३.५० वा. पोहचेल. ट्रेन क्रमांक ११०३२ दिनांक २६.०२.२०२६ पासून अलीपूरद्वार येथून दर गुरुवारी ०४.४५ वा. सुटेल व पनवेल येथे तिसऱ्या दिवशी ०५.३० वा. पोहचेल.

या गाडीला कल्याण, नाशिक रोड, जळगाव, भुसावळ, इटारसी, पिपरिया, जबलपूर, कटनी, सतना, मानिकपूर, बरगढ, प्रयागराज छिवकी, मेजा रोड, मिर्झापूर, पं. दीनदयाल उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापूर, पाटलिपुत्र, सोनपूर, हाजीपूर जंक्शन, मुजफ्फरपूर, समस्तीपूर, हसनपूर रोड, खगडिया, मानसी, नौगछिया, कटिहार, बरसोई, किशनगंज, अलुआबारी रोड, न्यू जलपाईगुडी, सिलीगुडी, बिन्नागुडी व हासीमारा हे थांबे देण्यात आले आहेत.

ट्रेन क्रमांक ११०३१ साठी आरक्षण १९.०२.२०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर व www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल. अनारक्षित डब्यांसाठी सामान्य दराने तिकीट णढड प्रणालीद्वारे काढता येतील. प्रवासी तिकीट आरक्षणासाठी RailOne अॅप देखील डाउनलोड करू शकतात.

# महापौरांकडून पालिका रुग्णालयांचा दौरा

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरच्या नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील यांनी सीबीडी, नेरूळ, आणि ऐरोलीतील महापालिका रुग्णालयाचा पाहणी दौरा केला.

या वेळी त्यांनी या रुग्णालयातील आरोग्य सुविधा बाबत कमतरता लक्षात घेत, त्या लवकरात लवकर कशा पूर्ण होतील याकडे लक्ष देणार असल्याचे सांगितलंय. तसेच बेड आणि पाहिजे असलेल्या आरोग्य सुविधा सोयीस्कर रित्या आणि वेळेवर उपलब्ध होण्यासाठी एक डॅशबोर्ड तयार करणार असल्याची संकल्पना आखली असून, येत्या सोमवार पर्यंत हा डॅशबोर्ड कार्यान्वित होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे देखील महापौर यांनी सांगितलय. तसेच शहरातील नागरी आरोग्य केंद्र व्यतिरिक्त उप आरोग्य केंद्र देखील सुरू करणार आहोत.

ज्या ठिकाणी आरोग्य केंद्राची गरज आहे, मात्र जागे अभावी ते आपण उभारू शकत नाहीत, त्या ठिकाणी कंटेनर मध्ये आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे. जेणेकरून रुग्णांच्या घरापर्यंत आरोग्यसेवा पुरवणार असल्याचं महापौर सुजाता पाटील यांनी म्हटले.



# एनआरबी एज्युकेशनल ट्रस्टच्या शिक्षण प्रसारक विद्यालयाचे सुयश

**नवी मुंबई : बातमीदार**

सेवा सहयोग फाउंडेशन व टिया ग्लोबल कॅपेबिलिटीज यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त नवी मुंबईतील शाळांसाठी विज्ञान प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात नवी मुंबईतील २४ शाळांचा सहभाग नोंदविण्यात आला. एकूण १४४ विद्यार्थ्यांनी ४३ विज्ञान प्रकल्प सादर केले.



या प्रकल्प स्पर्धेत एन.आर.बी. एज्युकेशनल ट्रस्ट, नेरूळ संचालित शिक्षण प्रसारक विद्यालय (माध्यमिक), नेरूळ येथील इयत्ता आठवीतील बालवैज्ञानिक वैभवी सावळे आणि स्नेहा कांबळे यांनी मार्गदर्शक शिक्षक शेखर शांताराम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली 'शेतकऱ्यांसाठी समस्या समाधान' या विषयावरील प्रकल्प सादर करून प्रथम क्रमांक पटकावला.

विद्यालयाच्या या यशामुळे एन.आर.बी. एज्युकेशनल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष नामदेव भगत यांनी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

या वेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्राजक्ता कांचन कोठेकर तसेच शिक्षकवृंद प्रदीप खिस्ते, पूर्वा ठाकरे,रंजना

# नवी मुंबईत सखोल स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ नवी मुंबई शहराचे मानांकन उंचाविण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने दैनंदिन स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जात असतानाच २८ व १ तारखेला होणाऱ्या 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात येत आहेत.



या अनुषंगाने घणसोली साईबाबा मंदिर परिसर, नेरूळ सेक्टर १९ गुरुद्वारा परिसर, सेक्टर ८ ऐरोली मैदान परिसर, बेलापूर रेल्वे स्थानक व आग्रोळी गाव परिसर, जुहूगाव जॉगिंग ट्रॅक व परिसर, वाशी, सेक्टर १० येथील गुरुद्वारा धार्मिक स्थळ परिसर याठिकाणी विशेष स्वच्छता मोहीमा राबविण्यात आल्या तसेच कोपरखैरणे शाळा क्र. ३९,४०, ४२ येथील विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेच्या सात सवयींबाबत जागरूकता करण्यात आली. या मोहीमांमध्ये संबंधित विभागातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व स्वच्छता दूत आणि नागरिक सहभागी होते. हिंद-दी-चादर' अंतर्गत १३ ठिकाणच्या आरोग्य शिबिरांचा १९०३ नागरिकांनी घेतला लाभ.

# महाशिवरात्रीनिमित्त रसायनीत यात्रा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील गुळसुंदे, शिवगंगा, खारेश्वर, पाताळेश्वर, रसेश्वर, आळी आंबिवली येथील शिवमंदिरात महाशिवरात्री निमित्ताने मोठा धार्मिक सोहळा झाला. या निमित्ताने मोठी यात्रा भरली होती, लहान मुलांनी त्याचा मोठा आनंद लूटला.

गुळसुंदे, खारेश्वर, पाताळेश्वर, रसेश्वर हे शिवलिंग स्वयंभू आहे. महाशिवरात्रीनिमित्त दर्शनासाठी रायगड जिल्ह्यासह नवी मुंबई, ठाणे, मुंबई, पुणे येथून भाविक आल्याचे पहावयास मिळाले. महाशिवरात्री निमित्ताने मोठी यात्रा भरली जाते. यात पाळणा, झेपोला, झुक झुक गाडी यासारखे खेळ असतात, तर लहान मुलांची खेळणी,कपडे, खजूर याचा बाजार भरतो. रसायनीसह आसपासच्या परिसरातील नागरिकांची दर्शनासाठी अधिक गर्दी झाल्याचे चित्र दिसून आले.



# पत्रकार कै. धनंजय गोंधळींना ग्रामस्थांकडून श्रद्धांजली

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

उरण कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) ने चिरनेर या गावी जाऊन उरणातील जेष्ठ पत्रकार कै. धनंजय गोंधळी यांच्या निवासस्थानी ग्रामस्थांसमवेत श्रद्धांजली अर्पण केली.



या वेळी अध्यक्ष स्थानावर कै.धनंजय गोंधळी यांना मानून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यावेळी कोमसापचे विश्वस्त साहित्यरत्न रायगड भूषण प्रा.एल.बी.पाटील म्हणाले की, गोंधळीसाहेबांना शेती, येथील गावे आणि भागातल्या सर्व समस्यांना खऱ्या अर्थाने न्याय दिला. त्यामुळे त्यांना या मातीशी एकजीव झालेला प्रामाणिक पत्रकार मानतो.

उद्योगपती राजा खारपाटील म्हणाले की, ते माझे एक चांगले मार्गदर्शक होते. तर उरण कोमसाप अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे यांनी माझ्यासारख्या तरुण लेखकाला प्रेमाने पत्रकारिकतेचे ज्ञान दिले आहे. पत्रकार दत्ता म्हात्रे, पत्रकार बनण्यात गोंधळी साहेबांचा मोठा वाटा आहे. कवी रमण पंडित आणि कवी शिवप्रताप पंडित यांनी गोंधळी साहेबांच्या स्वभावाने झालेला प्रभाव आपल्या भाषणातून मांडला. सूत्रसंचालन म.का. म्हात्रे यांनी केले.

तंटामुक्ती अध्यक्ष अलंकार परदेशी, प्रतीक गोंधळी, चंद्रकांत म्हात्रे, सुहास गोंधळी, अमर परदेशी, चंद्रकांत गोंधळी, वसंत म्हात्रे, जगन्नाथ म्हात्रे या प्रमुख ग्रामस्थांची उपस्थिती होती.

# आरोग्य शिबिरांचा १९०३ नागरिकांनी घेतला लाभ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईकर नागरिकांच्या आरोग्यासाठी जागरूकता दाखवित शासनाच्या हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांतर्गत मंगळवारी (दि.१७) माँसाहेब मिनाताई ठाकरे रूग्णालय, नेरूळ तसेच नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, सीबीडी बेलापूर, करावे, नेरूळ २, कुकशेत, कोपरखैरणे सेक्टर १६, घणसोली, पावणे, जुहूगाव, राबाडा, दिघा, तुर्भे व इलठनपाडा यांच्या कार्यक्षेत्रामध्ये १३ शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ १९०३ नागरिकांनी घेतला.

या शिबिरामध्ये, नागरिकांच्या आरोग्य तपासणी अंतर्गत उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठीची तपासणी, तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या तोंडाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी, माता बाल आरोग्य व लसीकरण, क्षयरोग होण्याची अतिजोखीम असलेल्या महिलांची क्षयरोग निदानासाठीची तपासणी, सिकलसेल रोग तपासणी करण्यात येत आहे. ही विशेष शिबिरे २५ फेब्रुवारीपर्यंत आयोजित करण्यात येत आहेत.



# पु. शि. रेगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'छांदसी' कविसंमेलन

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात १७ फेब्रुवारी रोजी मराठीतील श्रेष्ठ कवी पु. शि. रेगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थीकवी-कवयित्रींच्या कविसंमेलनाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. कोकण मराठी साहित्य परिषद, शाखा उरण यांच्या सहकार्याने मराठी विभाग व ग्रंथालय विभागाने संयुक्तपणे भरविलेल्या या कविसंमेलनाला 'छांदसी' हे नाव देण्यात आले. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यात ग्रंथालय विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली.



प्रास्ताविकात प्रा. गजानन चव्हाण यांनी 'छांदसी' हे शीर्षक निवडण्यामागील औचित्य स्पष्ट केले. त्यांनी पु. शि. रेगे यांचा 'छांदसी' हा समीक्षा-लेखसंग्रह मराठी साहित्यातील महत्त्वाचा ग्रंथ असून त्यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत या काव्यसंमेलनाला तेच नाव देण्यात आल्याची माहिती दिली. रेगे यांच्या काव्यदृष्टि व समीक्षेच्या परंपरेत त्यांचे मोलाचे योगदान विद्यार्थ्यांसमोर त्यांनी प्रभावीपणे उलगडले.

कविसंमेलनात काव्यवाचक म्हणून गजआनन म्हात्रे, राम म्हात्रे, श्रीमती अपेक्षा गोसावी आणि शिवप्रसाद पंडित यांनी विविध विषयांवरील रचना सादर केल्या. विद्यार्थीकवयित्रींमध्ये समिधा रेवसकर, माही भोईर, हर्षदा महांकाळ आणि दौलत पाटील यांनी तरुणाईची स्वप्ने, जगण्यातील संघर्ष आणि निसर्गाशी असलेले भावबंध व्यक्त करणाऱ्या कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी सर्व कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील होते. प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांच्या हस्ते सर्व निमंत्रित मान्यवरांचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. राम गोसावी, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. बळीराम पवार आणि मराठी विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती लाभली.

आभार प्रदर्शन संयोजक प्रा. डॉ. चिंतामण धिंदळे यांनी केले. त्यांनी सर्व मान्यवर, कवी, विद्यार्थी, कोकण मराठी साहित्य परिषद आणि महाविद्यालयीन विभागांचे आभार मानले.

# शिवजन्मोत्सवनिमित्त आज महाआरोग्य शिबिर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई रिक्षा चालक मालक वेल्फेअर असोसिएशन आणि सिद्धिविनायक मित्र मंडळ यांच्या वतीने आयकर कॉलनी बेलापूर येथे शिवजन्मोत्सव सोहळा १९ फेब्रुवारी २०२६ रोजी स. ८ ते सायं. १० वा पर्यंत साजरा करण्यात येणार आहे, असे आयोजक सुभाष गायकवाड यांनी सांगितले.

सकाळी शिवज्योत छत्रपती शिवाजी महाराज चौक, नेरूळ, सेक्टर १ येथून आयकर कॉलनी येथे येईल. इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीची पुजन होऊन क्लाऊड नाईन हॉस्पिटल यांच्या माध्यमातुन भव्य मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर मुलासाठी विविध स्पर्धा तर सायंकाळी राष्ट्रीय महापुरुषांच्या जीवनावर आधारित संगितमय ऑर्केस्ट्रा होणार आहे. तर रात्री स्नेहभोजन व बक्षीस वितरण समारंभ होणार असल्याचे सुभाष गायकवाड यांनी सांगितले.

# श्रीवर्धन तालुक्यामध्ये ‘रानवली पॅटर्न’ ठरतोय आदर्श

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

गावचा ‘पार’ म्हणजे निवांत गप्पा, थोडा विसावा आणि दैनंदिन चर्चांचा कट्टा-पण रानवलीत ही संकल्पना आता नव्या अर्थाने उभी राहिली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत रानवली ग्रामपंचायत यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोरील पाराला ज्ञान, माहिती आणि सामाजिक सलोख्याचे केंद्र बनवले आहे. ‘बोलका पार’ या अभिनव उपक्रमातून येथे मराठी व उर्दू वृत्तपत्रांचे खुले वाचनालय सुरू करण्यात आले असून, या उपक्रमाचा शुभारंभ ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत मोठ्या



उत्साहात पार पडला. भिंती झाल्या मार्गदर्शक; माहिती झाली सहज-सोपी

या पाराच्या भिंतींवर आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, महिला सक्षमीकरण, शासकीय योजना आदी विषयांवरील प्रबोधनपर आणि आकर्षक भित्तीचित्रे साकारण्यात आली आहेत. ही चित्रे केवळ सजावट नसून, ती दृश्य भाषेतून नागरिकांशी संवाद साधतात. वाचन-लेखनात अडचण असलेल्या ग्रामस्थांनाही योजनांची माहिती समजावी, सरकारी संदेश रटाळ न वाटता रंजक आणि परिणामकारक पद्धतीने पोहोचावा-हा या संकल्पनेचा मूळ हेतू आहे.

बोलका पार’चे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण रूप म्हणजे मराठीसोबत उर्दू वृत्तपत्रांची उपलब्धता. बहुभाषिक वाचनाच्या माध्यमातून रानवलीने सर्वसमावेशकतेचा जिवंत आदर्श उभा केला आहे. माहितीचा प्रवाह एका भाषेपुरता मर्यादित न ठेवता, गावातील प्रत्येक घटकाला जोडणारा हा उपक्रम हिंदू-मुस्लिम ऐक्याचा सशक्त संदेश देतो. रानवली पॅटर्न’कडे तालुक्याचे लक्ष

या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे श्रीवर्धन तालुक्यात रानवली पॅटर्न’ची चर्चा रंगू लागली आहे. इतर ग्रामपंचायतींसाठी हा उपक्रम प्रेरणादायी मॉडेल ठरत असून, ग्रामीण भागात माहिती-संवादाची नवी दिशा देणारा ठरतो आहे. परंपरेला आधुनिकतेची जोड देत, रानवलीचा ‘बोलका पार’ ग्रामीण परिवर्तनाचा बोलका आणि प्रेरणादायी पुरावा ठरत आहे.

# कोथेरी धरण घळभरणी कामाला प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांचा तीव्र विरोध

**महाड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात कोल आणि कोथेरी गावांच्या मध्यभागी उभारण्यात येत असलेल्या कोथेरी मध्यम सिंचन प्रकल्पाच्या धरण भिंतीच्या घळभरणी कामाला मंगळवारी स्थानिक प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवित काम बंद पाडले आहे. लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा आणि शंभर टक्के पुनर्वसन पूर्ण झाल्याशिवाय घळभरणी करू नये, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाकडे पत्रव्यवहार करूनही काम सुरू ठेवल्याचा आरोप होत असून, घळभरणीनंतर पाणीसाठा झाल्यास आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होईल, अशी भीती प्रकल्पग्रस्तांकडून व्यक्त केली जात असल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोल आणि कोथेरी गावांच्या दरम्यान उभारला जाणारा अनेक वर्षापासून रखडलेला हा मध्यम सिंचन प्रकल्प महत्त्वाचा प्रकल्प मानला जातो. सुमारे ३३.९२ मीटर उंची



आणि ४५० मीटर लांबी असलेल्या मातीच्या धरणामुळे ११ गावे आणि महाड शहरासाठी मुबलक पाणी उपलब्ध होणार आहे. एकूण ८.८० दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आणि ८.२२ दशलक्ष घनमीटर उपयुक्त साठा अशी या प्रकल्पाची क्षमता असून महाड शहराचा पाणीपुरवठा व परिसरातील सिंचन हा मुख्य उद्देश आहे. १९८३ साली मूळ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही पुनर्वसन, निधीअभावी अडथळे आणि स्थानिक विरोधामुळे प्रकल्प पूर्णत्वास गेलेला नाही.

बाधित कुटुंबांचे पुनर्वसन रखडल्याने कामाला वारंवार अडथळे येत असून, थेट आर्थिक पॅकेज देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतल्याची माहिती आहे, मात्र पुनर्वसन प्रत्यक्षात पूर्ण झाल्याशिवाय धरणाची घळभरणी होऊ देणार नाही, असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतल्याने प्रशासन आणि प्रकल्पग्रस्त यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे.

याबाबत संबंधित पाटबंधारे विभागाकडून माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता वेळेअभावी याबाबत अधिकृतपणे ठोस अशी अधिक माहिती मिळू शकलेली नाही परंतु पुनर्वसन व आर्थिक लाभाचा विचार करता शासन व प्रकल्पग्रस्तांमधील करारापैकी २१० प्रकल्पग्रस्तांपैकी १६० ते १७० जणांचे करारानुसारचे पुनर्वसन जवळपास पूर्ण झाले असून उर्वरित ६५ टक्के लाभातील ४० ते ४२ प्रकल्पग्रस्तांचा मुद्दा हा या आंदोलनातील प्रमुख असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. याबाबतचे बहुतांश अधिकार हे महसूल विभागाला प्राप्त असल्याने आता शासन,प्रशासन आणि जलसंपदा विभाग काय तोडगा काढते ते पाहणे महत्त्वाचे आहे.

# वाहतूक सुरळीत ठेवण्याचे दुकानदारांना आवाहन

**मुरुड ; प्रतिनिधी**

मुरुड शहरात दिवसेंदिवस वाहतूक कोंडी होत असल्याने ही कोंडी सुरळीत करण्यासाठी मुरुड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व रायगड जिल्हा वाहतुक शाखा पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांनी शहरा मधील मुख्य बाजारपेठेतील सर्व दुकानदारांना पत्रक काढून आपल्या दुकानात माल उतरविणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे.तरी वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या गंभीर वाहतुक कोंडी बाबत दुकानदारांनी योग्य दक्षता घेऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले.

बाजारपेठेतील दुकानांमध्ये माल पुरवठा करणारी वाहने सार्वजनिक रस्त्यावर वाहतूकीस अडथळा निर्माण होईल अशा ठिकाणी उभी करून माल चढविणे- उतरविणे करण्यात येत आहे.यामुळे सतत वाहतूक कोंडी होउन नागरिकांना होणारा त्रास तसेच आपत्कालीन वाहनांच्या हालचालींना अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे.याबाबत तोंडी सुचना देवुन ही सदर प्रकार सुरुच असल्याने ही बाब गंभीर व कायद्याचे उल्लंघन करणारी आहे.तरी अंतिम सुचना असुन आपण कोणत्याही परिस्थितीत सार्वजनिक रस्त्यावर रहदारीच्या ठिकाणी माल उतरविण्यासाठी वाहने उभी करु नयेत.तुम्हाला मला उतरविण्यासाठी नियोजित जागेत व अत्यल्प वेळेत पूर्ण करावी.गर्दीच्या वेळेत माल चढविणे- उतरविणे पुर्णतः बंद ठेवावे. या सुचनांचे पालन न केल्यास मोटार वाहन कायदा १९८८ मुंबई पोलीस अधिनियम तसेच इतर लागु कायद्यानुसार दंडात्मक व कायदेशीर कारवाई ,वाहन जप्ती व दंड आकारण्यात येईल.यांची गंभीर नोंद घ्यावी.

वाहतुक सुरळीत ठेवणे हा सार्वजनिक हिताचा विषय असुन या मध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही.तरी दुकानदारांनी सहकार्य करावे असे आवाहन रायगड जिल्हा वाहतूक शाखा पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी लेखी पत्राद्वारे करण्यात आले आहे. हे पत्रक वाहतूक पोलीस नाईक किशोर बठारे यांच्या कडुन बाजारपेठेतील दुकानदारांना वाटप करण्यात आली आहे.

# नियोजनातून समृद्धीकडे! श्रीवर्धन नगर परिषदेच्या नव्या विकास आराखड्यातून आरोग्यदायी शहराची घडण

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराचा सर्वांगीण, सुरक्षित आणि आरोग्यदायी विकास घडवण्यासाठी श्रीवर्धन नगरपरिषद यांनी नव्या विकासकामांचे सखोल आणि दूरदृष्टीपूर्ण नियोजन हाती घेतले आहे. केवळ रस्ते व इमारती उभारणे एवढ्यापुरते मर्यादित न राहता, नागरिकांचे आरोग्य, पर्यावरणीय समतोल, कायदेशीर शिस्त आणि शाश्वत नागरी जीवनमान या चौकटीत हे नियोजन आखण्यात आले आहे.

शहरातील वाढती लोकसंख्या, पर्यटनाचा वाढता ताण आणि भविष्यातील गरजा



लक्षात घेता, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पावसाळ्यात पूरस्थिती टाळण्यासाठी सुसज्ज निचरा व्यवस्था, स्वच्छ व पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक उपाययोजना यांचा समावेश या विकास आराखड्यात करण्यात आला आहे. यासोबतच सार्वजनिक स्वच्छतागृहे, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयी, तसेच दिव्यांग-सुलभ पायाभूत सुविधा यांवर विशेष भर देण्यात येणार आहे.

आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या बाबी जसे की स्वच्छ हवा, हिरवळीचे जतन, उद्याने, खुली व्यायामस्थळे आणि सुरक्षित पादचारी मार्ग - या विकास प्रक्रियेचा अविभाज्य भाग ठरणार आहेत. एलईडी पथदिव्यांमुळे ऊर्जा बचत होणार असून रात्रीच्या वेळेस सुरक्षिततेत वाढ होणार आहे. यामुळे शहर अधिक प्रकाशमान, सुरक्षित आणि आरोग्यदायी बनेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या सर्व विकासकामांची अंमलबजावणी महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम, नगररचना नियमावली आणि शासनाच्या आर्थिक शिस्तीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसारच केली जाणार आहे. प्रत्येक कामासाठी प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी, अंदाजपत्रकाची तरतूद आणि पारदर्शक ई-निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. गुणवत्तेवर कोणतीही तडजोड होऊ नये यासाठी तृतीय-पक्ष तपासणी व नियमित लेखापरीक्षणाची तरतूदही करण्यात येणार आहे.

या विकास प्रक्रियेत नागरिकांचा सहभाग केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. नागरिकांच्या सूचना, हरकती व अपेक्षा समजून घेऊनच कामांचे प्राधान्यक्रम ठरवले जाणार असून, त्यामुळे विकास हा लोकाभिमुख आणि गरजाधिष्ठित राहील. विकास म्हणजे केवळ बांधकाम नव्हे, तर आरोग्यदायी आणि सुसंस्कृत जीवनशैली, या विचारातून हे नियोजन पुढे जात आहे.

एकंदर पाहता, नियोजनबद्ध आणि उत्तरदायी पद्धतीने राबवली जाणारी ही नवी विकासकामे श्रीवर्धन शहराला केवळ आधुनिकच नव्हे तर आरोग्यदायी, स्वच्छ आणि राहण्यायोग्य शहर म्हणून नवी ओळख देणारी ठरणार आहेत.

# महाडचा श्री वीरेश्वर महाराज छबिना उत्सव

रायगड, रत्नागिरी जिल्ह्यासह कोकणातील महत्त्वाचे देवस्थान असलेले त्याचबरोबर महाड पोलादपूर तालुक्याचे आराध्य दैवत श्री वीरेश्वर महाराज यांचा पारंपारिक छबिना उत्सवाचा शुभारंभ शुक्रवार दि.१३ फेब्रुवारी पासून महाराजांच्या गादी पूजनाने अत्यंत भक्ती भावा मध्ये, शिवभक्तांच्या उपस्थितीत करण्यात आला. दक्षिण रायगड जिल्ह्यातील शिवभक्त ज्या उत्सवाचे आतुरतेने वाट पाहत होते, तो.उत्सव भव्य स्वरूपात तसेच मंगलमय, आनंदी वातावरणामध्ये साजरा करण्यासाठी श्री वीरेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टच्या सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली, महाड परिसरातील हजारो शिवभक्त सेवेकरी कामाला लागले आहेत.



तमाम भारतीयांचे पवित्र आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या, मराठी पातशाही स्थापन करण्यात आलेल्या दुर्गराज रायगडच्या पायथ्याशी महाड नगरीमध्ये श्री वीरेश्वर महाराजांचे अधिष्ठान शेकडो वर्षापासून असल्याची नोंन इतिहासात आढळून येते. स्वतः छत्रपती शिवाजी महाराज ज्या ज्या वेळी मोहिमेवर जात असत त्या त्या वेळी श्री वीरेश्वर महाराजांचे दर्शन घेत असत. असे हे रायगड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाचे असलेले देवस्थान श्री वीरेश्वर महाराज यांचा छबिना उत्सव म्हणजे शिवभक्तांची पर्वणी असते.

मराठी राज्याचे छत्रपती शाहू राजे यांचे सरदार यशवंतराव पोतनीस हे रायगडचे सुभेदार आणि महाडचे वतनदार यांची श्री वीरेश्वर महाराजांवर अपार श्रद्धा होती, श्री देव वीरेश्वर यांच्या श्रद्धेपोटी त्यांनी भव्य मंदिर उभे केले. पश्चिमाभिमुख म्हणजे पश्चिमेकडे तोंड असलेले हे देऊळ एका चौथऱ्यावर बांधले आहे . स्थापत्य कलेतील अत्यंत सुंदर बांधकाम असलेले हे मंदिर सरदार यशवंतराव पोतनिस यांनी १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात बांधले असल्याची नोंद आहे. मंदिर भव्य असून मंदिराचे बांधकाम पूर्णपणे दगडी आहे .भिंतीवर अत्यंत आकर्षक कोरीव काम करण्यात आले आहे. मंदिरातील



अंतर भागातील दगडी बांधकाम अत्यंत सुबक आणि सुंदर करण्यात आले. त्याचप्रकारे मंदिरा सभोवताली देखील अत्यंत सुंदर असे वातावरण असल्याचे आपल्याला दिसून येते.

ऐतिहासिक शिवकालीन तसेच तमाम शिवभक्तांचे आराध्य दैवत असलेल्या श्री वीरेश्वर महाराज यांचा छबिना उत्सव गादी स्थापना आणि पेटी पूजनाने शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी करण्यात आल्यानंतर मंदिरामध्ये विविध धार्मिक पूजा पाठ भजन कीर्तन इत्यादी कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. रविवारी १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री निमित्त महापूजेचे आयोजन करण्यात आले. या पूजेचा मान यशवंतराव पोतनिस यांचे वंशज संजय पोतनीस यांना असतो . महाशिवरात्रीची पूजा विशेष असल्यामुळे श्री वीरेश्वर महाराजांचे दर्शनासाठी लांबच रांगा लागल्या होत्या संपूर्ण मंदिर परिसर भक्तीमय झाला होता मंगळवारी १७ फेब्रुवारीला देव भोजन आणि महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

बुधवार १८ फेब्रुवारी रोजी रात्री या उत्सवातील प्रमुख छबीना उत्सव साजरा करण्यात येत आहे. या उत्सवाच्या दिवशी मंदिराचा परिसर श्री वीरेश्वर महाराजांच्या जय जय कराने दुमदुमून जात असताना ढोल आणि ताशांच्या गजरामध्ये सारा आसमंत महाराजांच्या छबिना उत्सवाचे स्वागत करीत असल्याचा आभास निर्माण होतो. याच वेळी उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी महाड तालुक्यातून विविध परिसरातील देवाधिकांच्या पालख्या वाजत गाजत सहभागी होण्यासाठी येत असतात. तालुक्यातील विन्हेरे येथील श्री देवी झोलाईची पालखीचे स्वागत महाडकर भाविक आणि लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीमध्ये ढोल ताशाच्या गजरात करण्यात येते, गावात तिचे आगमन झाल्यानंतर संपूर्ण शहराचे वातावरण भक्ती मय होते. शिरगाव येथील श्री देव काळभैरी चोचींडे येथील श्रीदेवी पद्मावती सव येथील श्री मानाई देवी, गोठे गावाची श्रीदेवी जातमाता आई, दासगाव येथील श्री काळभैरी, नाते येथील श्री देव रवळनाथ, मांडले येथील श्री देव भैरवनाथ त्याचबरोबर मुठवली आणि आंबे शिवथर येथील सासनकाठ्या छबीना उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी बुधवारी रात्री बारा वाजेपर्यंत येणार असल्याची माहिती देवस्थान ट्रस्ट कमिटी तर्फे देण्यात आली.

उत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या सर्व देवाधिकांच्या पालख्या या श्री वीरेश्वर महाराज यांच्या कुटुंबातील असल्याचे मानले जाते. श्री वीरेश्वर महाराज हे कुटुंब प्रमुख असून या सर्व बहिणी आपल्या थोरल्या भावाला भेटण्यासाठी येतात. बहिणी भावांची भेट हा अभूतपूर्व सोहळा त्याचबरोबर देवीचा गोंधळ इत्यादी पारंपारिक कार्यक्रम छबिना उत्सवामध्ये साजरे केले जातात. पूर्वी उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी असंख्य पालख्या आणि काठ्या येत असत, परंतु कालांतराने अनेक पालख्या आणि काठ्या येण्याचे बंद झाले, सत्तर वर्षांपूर्वी छबिना उत्सव काही शेकडो भाविकांच्या उपस्थितीमध्ये, मर्यादित स्वरूपात साजरा केला जात असे, परंतु देवस्थान कमिटीचे माजी सरपंच कैलासवासी रामबिलास शेट करवा, विठ्ठल शेठ जाधव (सावळाराम आप्पा), जनार्दन शेठ ठोंबरे, रामशेठ वडके, दगडू जाधव, मांगडे, पारधी, धोंडबाशेठ जाधव नानासाहेब गुरव आणि त्यांना सहकार्य करणारे असंख्य शिवभक्तांनी उत्सवाची परंपरा कायम राखत शिवभक्त कै. दगडूशेठ पार्टे यांच्या सरपंच पदाच्या कारकिर्दीमध्ये उत्सवाचे स्वरूप भव्य झाले. त्याचबरोबर मंदिर परिसराचे बांधकाम करण्यात आले . भव्य सभागृह दुकानची गाळे यातून देवस्थानला कायमस्वरूपी उत्पन्न सुरू झाले.

दक्षिण रायगड जिल्ह्यामध्ये सांस्कृतिक, अध्यात्मिक वारसा जतन करणारा महाड येथील श्री वीरेश्वर महाराज यांचा छबिना उत्सव आनंदी वातावरणात साजरा करण्यासाठी श्री वीरेश्वर देवस्थान ट्रस्टचे सरपंच दीपक वारंगे, उपसरपंच रमेश नातेकर, सेक्रेटरी अनंत दामोदर शेठ, खजिनदार संजय पवार, माजी सरपंच तथा विश्वस्त दिलीप पार्टे, ॲड रसिकलाल गांधी, गणेश वडके, ॲड. हेमंत चांदलेकर, मनोहर जंगम (पुजारी) यांच्या सह छबीना उत्सव कमिटीचे अध्यक्ष साहिल पार्टे, योगेश नातेकर व तमाम शिवभक्त अपार मेहनत घेत आहेत.विशेष म्हणजे राज्याचे मंत्री भरत शेठ गोगावले यांच्या प्रयत्नातून श्री वीरेश्वर महाराज यांना रायगड पोलीस दलाकडून मानवंदना दिली जाते. मागील चार वर्षापासून मानवंदना देण्याची प्रथा सुरू आहे.

**-महेश शिंदे, महाड**

# रस्त्यांच्या कामांमुळे वाहतूक कोंडी; विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे वाहतुक कोंडीची समस्या उद्भवत आहे. परिक्षा कालावधीत निर्माण होणाऱ्या या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना प्रंचड त्रास होत आहे. शाळेचे वेळापत्रक कोलमडले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने यात हस्तक्षेप करावा आणि परीक्षा कालावधीत वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी दत्ताजीराव खानविलकर एज्युकेशनल ट्रस्टचे अध्यक्ष अमर वार्डे यांनी केले. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना निवदेन देऊन त्यांनी याप्रकरणात हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे.

रेवस रेड्डी सागरी मार्गाच्या कामाला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून सुरुवात झाली आहे. अलिबाग पासून बेलकडे मार्गे नागाव पर्यंत रस्त्यांचे काम केले जात आहे. मात्र या कामामुळे ठिकठिकाणी सध्या वाहतुक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे. याचा फटका शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बसतो आहे. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परिक्षा सध्या सुरू आहेत. यासाठी ग्रामिण भागातून मोठ्या संखेनी विद्यार्थी येतात. त्यामुळे या कालावधीत वाहतूक कोंडीची समस्या उद्भवणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. हीबाब लक्षात घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी त्यांनी केली अन्यथा शाळेतील दोन हजार विद्यार्थ्यांना घेऊन आंदोलन करावे लागेल असा इशारा त्यांनी दिला.

सोमवारी झालेल्या वाहतुक कोंडीनंतर संबधित ठेकेदारांला रस्त्याचे काम रात्रीच्या वेळी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

# खोपोलीत स्वच्छतागृहांची दुरवस्था

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरी सुलभ शौचालय योजने अंतर्गत राज्य शासनाच्या विशेष निधीतून खोपोली शहरात एकूण १२ स्वच्छता गृह व सार्वजनिक शौचालयांची निर्मिती करण्यात आली होती, मात्र वेळोवेळी डागडुजी व दुरुस्ती न झाल्याने वर्तमान स्थितीत यातील बहुतांश शौचालयांची स्थिती धोकादायक बनली आहे.

या शौचालयांचे आतून व बाहेरून प्लास्टर निखडले असून, भिंती व छत धोकादायक बनली आहेत तसेच येथील अंतर्गत डागडुजी न झाल्याने अतिशय भयानक स्थिती बनली आहे. याशिवाय अपूर्ण पाणी व नळ, भांडी तुटली आहेत. स्वच्छता सर्वेक्षण अभियानासाठी केंद्र व राज्य शासनाकडून नगरपालिकेला विशेष निधी प्राप्त होतो. हा निधी शहरातील सार्वजनिक स्वच्छता अबाधित राहण्यासाठी व नागरिकांचे आरोग्य सुविधा व्यवस्थित ठेवण्यासाठी सार्वजनिक शौचालयांची डागडुजी व दुरुस्ती व्हावी, अशी मागणी नगरसेवकां सहित नागरिकांकडून केली जात आहे.

# रद्दी विक्रीसाठी दरपत्रकांचे आवाहन

**अलिबाग :** जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग या कार्यालयातील जुन्या वृत्तपत्रांची रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाप्यात दि.२० फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालय,रायगड-अलिबाग,जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशेजारी, अलिबाग येथे सादर करावीत असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी यांनी केले आहे.

# मध्य रेल्वेकडून १८६ विशेष गाड्या

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मुंबई - नागपूर/सावंतवाडी रोड / बनारस /गोरखपूर / समस्तीपूर /दानापूर तसेच पुणे - नागपूर /हजरत निजामुद्दीन / दानापूर दरम्यान एकूण १८६ विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत.यामध्ये ९४ होळी विशेष गाड्या आणि ९२ विशेष गाड्या यांचा समावेश आहे

विशेष गाडी क्रमांक ०२१४१, ०२१४२, ०११७१, ०१०७९, ०१११९, ०१०७३, ०१०४३, ०११४३, ०१४६९, ०१४७०, ०१४५७, ०१४५८, ०१४८१, ०१४४९, ०१४३१, ०१४१५ व ०१४९१ यांचे आरक्षण दिनांक १८.०२.२०२६ पासून* सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर संकेतस्थळावर आगाऊ आरक्षण कालावधी अंतर्गत उपलब्ध होईल.आगाऊ आरक्षण कालावधी नंतरच्या प्रवासासाठी आरक्षण संबंधित पुढील तारखेनुसार उपलब्ध होईल.अनारक्षित डब्यांसाठी सामान्य शुल्कासह प्रणालीद्वारे आरक्षण करता येईल..

# रणजी ट्रॉफी स्पर्धेत जम्मू-काश्मीरचा विजय

**बंगाल : वृत्तसंस्था**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये जम्मू-काश्मीर संघाने इतिहास घडवला आहे. दमदार कामगिरी करून जम्मू-काश्मीरने पहिल्यांदाच रणजी ट्रॉफी स्पर्धेतील फायनलमध्ये प्रवेश केला आहे. रणजी ट्रॉफी स्पर्धेतील सेमीफायनलचा सामना जम्मू-काश्मीर या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात बंगालकडून मोहम्मद शमीने दमदार गोलंदाजी केली, पण बंगालचा संघ हा सामना जिंकू शकलेला नाही. बंगालने जम्मू-काश्मीरसमोर विजयासाठी १२६ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना जम्मू-काश्मीर संघाने ६ गडी राखून विजय मिळवला.



या सामन्यात आकिब नबी जम्मू-काश्मीरच्या विजयाचा हिरो ठरला. आकिब नबीने या सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना ८७ धावा खर्च करून ५ गडी बाद केले. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना त्याने ३६ धावा खर्च करून ४ गडी बाद केले. दोन्ही डावात मिळून त्याने ९ गडी बाद केले. बंगालकडून गोलंदाजी करताना वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीनेही लक्षवेधी कामगिरी केली. शमीने पहिल्या डावात गोलंदाजी करताना ९० धावा खर्च करून ८ गडी बाद केले. तर दुसऱ्या डावात गोलंदाजी करताना त्याला २४ धावा खर्च करून १ गडी बाद केला. यासह त्याने दोन्ही डावात मिळून ९ गडी बाद केले.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना बंगालकडून सुदीप कुमार घरामीने १४६ धावांची दमदार शतकी खेळी केली. तर अभिमन्यू इश्वरनने ४९ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर बंगालने पहिल्या डावात ३२८ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या जम्मू-काश्मीरला पहिल्या डावात ३०२ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह बंगाल संघाने पहिल्या डावात २६ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या बंगालचा डाव घ्या ९९ धावांवर आटोपला. यासह जम्मू-काश्मीर संघाला अंतिम फेरीत प्रवेश करण्यासाठी अवघ्या १२६ धावांची गरज होती. हे आव्हान जम्मू-काश्मीर संघाने ४ विकेट्स गमावून पूर्ण केलं आणि पहिल्यांदाच या स्पर्धेतील अंतिम फेरीत आपलं स्थान निश्चित केलं.

बंगालच्या गोलंदाजांनी जम्मू-काश्मीरला आव्हानाच्या जवळ जाण्यापासून रोखण्यासाठी पूर्ण जोर लावला. पण जम्मू-काश्मीरच्या फलंदाजांनी संयम दाखवत धावांचा यशस्वी पाठलाग केला. यासह हा सामना ६ गडी राखून जिंकून फायनलमध्ये प्रवेश केला.

# रायगड जिल्ह्यात एमसीएच्या क्रिकेट सामन्यांना सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या वरिष्ठ गटातील पुरुषांच्या क्रिकेट स्पर्धेतील ग्रुप डी मधील सामन्यांना रायगड जिल्ह्यातील विविध मैदानांवर सुरवात करण्यात आली. ग्रुप डीमध्ये सहा संघ सहभागी झाले असून त्यामध्ये रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघा सह नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशन, क्लब ऑफ महाराष्ट्र, सेंट्रल डिफेन्स अकॅडमी पुणे, वायएमसीए क्रिकेट क्लब पुणे, सेंट्रल झोन असे संघ सहभागी झाले आहेत.

रायगड जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान गव्हाण उलवे, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्स रसायनी पाताळगंगा मैदान, रिलायन्स क्रिकेट ग्राउंड नागोठण ह्या मैदानांवर स्पर्धेतील सामन्यांची उत्साहात सुरवात झाली असून पहिल्या



साखळी फेरीच्या दोन दिवसीय सामन्यात, क्लब ऑफ महाराष्ट्र, वायएमसीए क्रिकेट क्लब पुणे व नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघानी विजय मिळवला आहे. रिलायन्स नागोठणे येथील मैदानावर झालेल्या रायगड विरुद्ध नाशिक संघांमधील सामन्यात रायगडच्या संघानी संथ गतीने गोलंदाजी केली परिणामी रायगडच्या संघाला २८ धावांची पॅन्टल्टी लागली असून सामना अनिर्णित राहिला असला तरी पहिल्या डावाच्या आधारे सामना नाशिकच्या संघाने जिंकला.

नाशिकच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद १६८ धावा अधिक २८ धावा ह्या संथ गतीने गोलंदाजी केली म्हणून पेनल्टी लागली व एकूण १९६ धावा नाशिकच्या संघाने काढल्या तर प्रतिउत्तर देताना रायगडच्या संघाने सर्व गडी गमावत १९० धावा केल्या. दुसऱ्या डावात नाशिकच्या संघाने सर्व गडी बाद २२७ धावा काढल्या तर रायगडच्या संघाने दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ८ गडी बाद १५० धावा फलकावर नोंदवल्या होत्या. पहिल्या डावात पेनल्टी लागल्यामुळे रायगडच्या संघाला सामना पहिल्या डावाच्या पिछाडीमुळे गमवावा लागला आहे.

दुसऱ्या सामन्यात क्लब ऑफ महाराष्ट्राच्या संघानी सेंट्रल झोन विरुद्ध खेळताना एक डाव व ६३ धावांनी जिंकला तर वायएमसीए क्लब पुणे संघानी सेंट्रल डिफेन्स अकॅडमी संघावर ७८ धावांनी विजय मिळवला आहे. १९ फेब्रुवारी पासून दुसऱ्या सकाळी फेरीतील सामन्यांना सुरुवात होणार आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील सचिव प्रदीप नाईक यांच्या सह सर्व पदाधिकारी व सदस्य सामने यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

# महिला प्रो मिनी फुटबॉल लीगची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला फुटबॉल फेडरेशन (डब्ल्यूएफएफआय), जे १९७५ मध्ये स्थापित झालेले ऐतिहासिक संस्था आहे आणि आता त्याचे सुवर्ण महोत्सव साजरा करत आहे, याने देशभरात महिला फुटबॉलसाठी सर्वसमावेशक राष्ट्रीय पुनरुज्जीवन योजना जाहीर केली आहे. फेडरेशनचे अध्यक्ष मुकेश शर्मा यांनी ही माहिती दिली. राष्ट्रीय मुख्य समितीचे अध्यक्ष नवीन हेगडे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, डब्ल्यूएफएफआयची रोडमॅप महिला फुटबॉलला व्यावसायिकदृष्ट्या व्यवस्थापित, आर्थिकदृष्ट्या शाश्वत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक खेळात रूपांतरित करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आली आहे.

समन्वय समितीचे अध्यक्ष यतीश बांगेरा म्हणाले, ५० वर्षांचा वारसा, भविष्यासाठी पुनर्रचित. फेडरेशनने पाच दशकांपूर्वी



महिला फुटबॉलचा विकास करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आता नव्या प्रशासकीय सक्रियतेसह आणि संरचित शासन यंत्रणेसह, फेडरेशन स्केल, पारदर्शकता आणि शाश्वत वाढीच्या नव्या युगात प्रवेश करत आहे. भारतातील महिला फुटबॉल आता ओळखीची वाट पाहत नाही – ती आपल्या हक्काच्या जागेची दावा करत आहे, असे यतीश बांगेरा म्हणाले.

नवीन हेगडे यांनी एक मोठी घोषणा केली. डब्ल्यूएफएफआयने महिला प्रो मिनी फुटबॉल लीग (डब्ल्यूपीएमएफएल) ची सुरुवात जाहीर केली आहे.

डब्ल्यूएफएफआयने २०२६ च्या स्पर्धा कॅलेंडरची घोषणा केली, ज्यात हे समाविष्ट आहे: यू-१२ मुले आणि मुली विकास लीग, सब-ज्युनियर राष्ट्रीय चॅम्पियनशिप, ज्युनियर राष्ट्रीय चॅम्पियनशिप, सिनियर राष्ट्रीय चॅम्पियनशिप, फेडरेशन कप, राष्ट्रीय कोचिंग आणि रेफरी प्रमाणपत्र कार्यक्रम.

**लीगच्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये हे समाविष्ट**

कॉम्पॅक्ट आणि उच्च-तीव्रतेच्या फॉमटवर चालणे, मुख्य शहरांमध्ये फ्रँचायझी मालकी प्रोत्साहित करणे, खेळाडूंना संरचित करार उपलब्ध करणे, कॉर्पोरेट प्रायोजक आणि सीएसआर भागीदारी आकर्षित करणे, लाइव्ह ब्रॉडकास्ट आणि डिजिटल स्ट्रीमिंगच्या संधी उपलब्ध करणे, ही उपक्रम महिला फुटबॉल खेळाडूंना आर्थिक स्वातंत्र्य देण्यासह खेळाचा राष्ट्रीय विस्तार करण्यासाठी स्थित आहे.

# वर्ल्डकपमधून ऑस्ट्रेलियाचे पॅकअप्!

**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत मंगळवारी झिम्बाब्वे आणि आयर्लंड या दोन संघांमध्ये सामना होणार होता, पण दोन तास वाट पाहूनही पाऊस न थांबल्याने हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही संघांना प्रत्येकी १-१ गुण देण्यात आला आहे. या एका गुणासह झिम्बाब्वेने सुपर ८ फेरीत प्रवेश केला आहे, तर ऑस्ट्रेलियाचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

झिम्बाब्वे आणि आयर्लंड यांच्यात होणारा सामना हा ऑस्ट्रेलियासाठी अतिशय महत्वाचा होता, कारण स्पर्धे तून बाहेर होण्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या ऑस्ट्रेलियाला ओमानविरूद्ध विजय मिळवूनही



झिम्बाब्वेच्या दोन्ही सामन्यातील पराभवाची वाट पहायची होती, पण झिम्बाब्वेचा संघ सामन्याचा निकाल न येताच आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सुपर ८ फेरीत प्रवेश करणारा सातवा संघ ठरला आहे.

आयसीसीच्या स्पर्धांमध्ये ऑस्ट्रेलियाचा नेहमीच दबदबा पहायला मिळत असतो, मात्र यावेळी असे काही घडलेले नाही. खेळाडूंनी नावाला साजेशी कामगिरी न करणे आणि प्रमुख खेळाडू दुखापतीमुळे संघाबाहेर होणे हे ऑस्ट्रेलियाच्या अपयशाचे प्रमुख कारण आहे. टी-२० फॉरमॅटमध्ये अनुभवापेक्षा मिळालेल्या संधीचे सोने कोण करतो हे महत्त्वाचे ठरते. जो संघ १२० चेंडूंमध्ये चांगली कामगिरी करतो, तो विजयाचा मानकरी ठरतो, पण ऑस्ट्रेलियाकडून तसा खेळ झाला नाही.

### झिम्बाब्वे सुपर ८मध्ये दाखल

झिम्बाब्वे संघासाठी हा ऐतिहासिक क्षण आहे, कारण झिम्बाब्वेने पहिल्यांदाच टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील सुपर ८मध्ये प्रवेश केला आहे. झिम्बाब्वेने या स्पर्धेतील तीनपैकी दोन सामने जिंकले आहेत, तर एक सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे झिम्बाब्वेचा संघ पाच गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे.

# युवराजचे विक्रमी शतक व्यर्थ!

## न्यूझीलंडची कॅनडावर मात; सुपर ८मध्ये एन्ट्री

**चेन्नई : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील चेन्नईच्या मैदानात खेळवण्यात आलेल्या सामन्यातील कॅनडाविरुद्धच्या विजयासह न्यूझीलंडच्या संघानेही सुपर ८मधील आपले स्थान पक्के केले आहे. पहिल्यांदा फलंदाजी करताना युवराज सिंग सामराच्या शतकाच्या जोरावर कॅनडाच्या संघाने निर्धारित २० षटकात १७३ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना न्यूझीलंडच्या ग्लेन फिलिप्स आणि रचिन रवींद्रने संघाला आठ विकेट्स आणि पालच



षटके राखून दिमाखादार विजय मिळवून दिला.

नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यावर कॅनडाचा सलामीवीर युवराज सामराने ६५ चेंडूत ११० धावांच्या खेळीसह संघाला १७३ धावांपर्यंत पोहचणावारी दमदार खेळी केली. त्याने या खेळीत अनेक विक्रम सेट केले. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत असोसिएट संघाकडून शतक झळकवणारा तो पहिला फलंदाज ठरला. याशिवाय सर्वात कमी वयात शतकी खेळीचा विश्वविक्रमही त्याने आपल्या नावे केला, पण त्याची ही ऐतिहासिक खेळी शेवटी व्यर्थ ठरली. न्यूझीलंडच्या संघाने सुरुवातीच्या पढझडीतून सावरत अपेक्षेप्रमाणे सुपर ८मध्ये प्रवेश केला. यंदाच्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत धावांसाठी संघर्ष करणारा रचिनही फॉर्मध्ये परतला. त्याची खेळी न्यूझीलंड संघाला मोठा दिलासा देणारी आहे.

## महिला आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धा

# भारत सेमी फायनलमध्ये दाखल

**बँकॉक : वृत्तसंस्था**

राधा यादवच्या नेतृत्वाखालील भारत 'अ' महिला संघाने नेपाळच्या संघाचा धुव्वा उडवत महिला आशिया कप रायझिंग स्टार्स स्पर्धेच्या सेमीफायनलमध्ये धडक मारली आहे. स्पर्धेत भारतीय संघाची सुरुवात युएईविरुद्धच्या पराभवासह झाली, पण त्यानंतर दुसऱ्या लढतीत भारतीय महिला संघाने पाकिस्तानला पराभवाचा दणका देत दमदार कमबॅक केले अन् नेपाळविरुद्धच्या विजयासह सेमी फायनलचे तिकीट मिळवले.

बँकॉक येथील टेर्डथाई क्रिकेट ग्राउंडवर भारत विरुद्ध नेपाळ यांच्यातील सामना खेळवण्यात आला. या सामन्यात भारतीय संघाने पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या नेपाळला १८ षटकांत अवघ्या ७८ धावांत गुंडाळले. या धावसंख्येचा



पाठलाग करताना भारताने ७.५ षटकांत तीन बाद ८२ धावा करत सामना जिंकला.

भारतीय संघाकडून गोलंदाजीत धमक दाखवणाऱ्या तनुजा कंवर हिला 'प्लेयर ऑफ द मॅच' पुरस्कार मिळाला. तिने चार षटकांत केवळ १२ धावा देत चार विकेट्स घेतल्या. तनुजाशिवाय मिनू मनी हिने चार षटकांत फक्त आठ धावा खर्च करत तीन विकेट्स घेतल्या, तर संघाचे नेतृत्व करणाऱ्या राधा जाधवने तीन षटकांत १७ धावा देत दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या.

नेपाळच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. डावातील पाचव्या चेंडूवरच दीपा यादवच्या रुपात संघाला पहिला धक्का बसला. अनुष्का शर्मा १० धावांवर माघारी परतली. मग वृंदा-तेजल जोडी जमली. दोघींनी तिसऱ्या विकेटसाठी २५ चेंडूत ५४ धावांची भागीदारी रचत सामना भारताच्या बाजूने झुकवला. तेजलने १३ चेंडूत १८ धावा केल्या, तर वृंदा दिनेश १८ चेंडूत नऊ चौकारांसह ३९ धावांची नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.

पाकिस्तान महिला संघही सेमी फायलमध्ये पोहचला आहे. त्यामुळे या स्पर्धेच्या फायनलमध्ये पुन्हा एकदा भारत-पाक सामना रंगण्याचे संकेत मिळत आहे.

# 'तेव्हा'पासून ऑस्ट्रेलियाला उतरती कळा

## गेल्या दोन वर्षात चार ट्रॉफींना मुकला 'कांगारूं'चा संघ

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसी स्पर्धांच्या ट्रॉफी आणि ऑस्ट्रेलिया हे एक वेगळेच समीकरण आहे. ऑस्ट्रेलिया संघाला आपण सतत आयसीसी स्पर्धांमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करत ट्रॉफीवर नाव आपले नाव कोरताना पाहिले आहे, पण सध्याच्या घडीला ऑस्ट्रेलिया संघाला उतरती कळी लागली आहे. ऑस्ट्रेलिया संघ टी-२० विश्वचषक २०२६च्या गट टप्प्यातूनच बाहेर पडला आहे. यानंतर मिचेल मार्शच्या त्या एका कृतीमुळे संघावर ही वेळ ओढवल्याचे चाहते म्हणत आहेत.

ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत १० आयसीसी जेतेपदे जिंकली आहेत. ऑस्ट्रेलिया संघाच्या नावे वनडे क्रिकेटमध्ये सहा जेतेपद आहेत. एक चॅम्पियन्स ट्रॉफी, एक वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप, तर टी-२० विश्वचषकाचे जेतेपदही संघाने २०२१मध्ये पटकावले होते. पण गेल्या काही काळापासून ऑस्ट्रेलियाची कामगिरी घसरताना दिसत आहे.

ऑस्ट्रेलिया संघ टी-२० विश्वचषक २०२६च्या गट टप्प्यातून बाहेर पडल्यापासून एक फोटो सातत्याने व्हायरल होत आहे. हा फोटो २०२३मध्ये झालेल्या वनडे वर्ल्डकपचा आहे. भारतात झालेल्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम फेरीत ऑस्ट्रेलियाने भारताला पराभूत करत विक्रमी सहाव्यांदा या स्पर्धेच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले. यानंतर ड्रेसिंग रूममध्ये सेलिब्रेशन करतानाचा एक फोटो समोर आला होता. मिचेल मार्श वर्ल्डकप ट्रॉफीवर पाय ठेवून बसला होता. या फोटोवर जगभरात विविध प्रतिक्रिया आल्या होत्या. ट्रॉफीवर पाय ठेवत ट्रॉफीचा अपमान केल्याचेदेखील चाहते म्हणत होते.

दोन्ही टी-२० विश्वचषकांमध्ये मिचेल मार्श संघाचा कर्णधार होता. बलाढ्य ऑस्ट्रेलियाला यंदाच्या टी-२० विश्वचषकात झिम्बाब्वे व श्रीलंका या संघांनी पराभूत करत स्पर्धेबाहेर केले. दरम्यान ऑस्ट्रेलिया संघाचा कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीमुळे संघाबाहेर आहे. याशिवाय संघाचा वेगवान गोलंदाज जोश हेझलवुडदेखील दुखापतीमुळे संघाबाहेर आहे. तर संघातील इतर सर्व खेळाडूंकडून अपेक्षित कामगिरी पहायला मिळाली नाही.

# आयपीएलसाठी वैभव सूर्यवंशीची दहावीच्या परीक्षेला 'दांडी'

**मुंबई :** भारतीय क्रिकेटचा उगवता तारा वैभव सूर्यवंशी याने क्रिकेट कारकिर्दीला प्राधान्य देत २०२६ची दहावीची बोर्ड परीक्षा न देण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. आगामी



इंडियन प्रीमियर लीगमधील सहभागासाठी त्याने सीबीएसई बोर्डाच्या परीक्षेवर पाणी सोडले असल्याचे समोर आले आहे.

वैभव सूर्यवंशीने आयपीएल आणि १९ वर्षांखालील स्तरावर आपल्या फलंदाजीची चुणूक दाखवत क्रिकेटविश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. अलीकडेच भारताला अंडर-१९ विश्वचषक जिंकून देण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली होती. विशेषतः अंतिम सामन्यात त्याने खेळलेली १७५ धावांची खेळी निर्णायक ठरली.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com